संस्थापकः राजन राजे

KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 2 | Issue : 12 | Marathi Monthly | Thane, 1 June 2025 to 30 June 2025 | Pages 16 | Price : 10/-

# ४६८ कोटी रुपयांच्या बिनव्याजी कर्जाची मागणी करण्याऱ्या, ठाणे महानगरपालिकेच्या कामकाजाची चौकशी करा!

## 'धर्मराज्य पक्षा'ची मुख्यमंत्र्यांकडे मागणी...

**थकबाकीची वसुली करण्यासाठी, जालीम उपाययोजना न करता, पुन्हा-पुन्हा कर्जाची मागणी करणे ही, करदात्यांची चक्क फसवणूक असून, हे पारदर्शक प्रशासकीय कारभाराचे उदाहरण होऊ शकते का? असा प्रश्न यनिमित्ताने उपस्थित होत असल्याचे नितीन देशपांडे यांनी आपल्या पत्रात थेटपणे अधोरेखित केले आहे.**

**ठाणे (प्रतिनिधी) : केंद्र सरकारकडून ठाणे महानगरपालिकेस, एक महिन्यापूर्वी सुमारे २०० कोटी रुपयांचे बिनव्याजी कर्ज दिले गेलेले असतानाच, ठामपा प्रशासनाने पुन्हा एकदा, शासनस्तरावर ४६८ कोटी रुपयांच्या बिनव्याजी कर्जाच्या मागणीसंदर्भात पत्रव्यवहार केल्याचे उघड झाले असून, याआधीही २१३ कोटी रुपयांचे बिनव्याजी कर्ज, ठामपाने टप्प्याटप्प्याने दोन वेळेस घेतल्याचेही उघड झाले आहे.**

याच पार्श्वभूमीवर, ठामपाने पुन्हा कर्जाची मागणी करणे ही, महापालिकेच्या गैरकारभाराची पावती असल्याची थेट टीका 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे करण्यात आली आहे. ठामपाच्या लेखापरीक्षण अहवालामधील गंभीर आक्षेप आणि दरवर्षी सातत्याने वाढणारी, अब्जावधी रुपयांची तूट या गैरकारभाराला कारणीभूत असल्याचे नमूद करुन, 'धर्मराज्य पक्षा'चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे प्रधान सचिव गोविंदराज यांना लिहिलेल्या पत्रात पुढे म्हटले आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम-१०५ नुसार, मुख्य लेखापरीक्षक, महापालिकेच्या लेख्यांची साप्ताहिक तपासणी व लेखापरीक्षक करुन, स्थायी समिती वा प्रशासकांना




देणे बंधनकारक आहे. अधिनियम-१०६ नुसार, प्रत्येक सरकारी वर्ष संपल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, मुख्य लेखापरीक्षकाने ते, स्थायी समितीसमोर सादर करणे बंधनकारक आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता-१९७१ चे नियम ६० नुसार, वार्षिक लेख्यांचा गोषवारा, ३१जुलै पूर्वी लेखाविभागामार्फत, मुख्य लेखापरीक्षकास सादर केला पाहिजे. प्रत्यक्षात मात्र, अंतिम गोषवारा सादर केला गेलेला नाही, त्यामुळे महापालिकेची आर्थिक स्थिती समजूत येत नाही, असे स्पष्टपणे २०१९-२० च्या लेखापरीक्षण अहवालात नमूद केले असून, याची आपण प्रकर्षाने नोंद घ्यावी, असे नितीन देशपांडे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे. ठाणे महानगरपालिकेचे मुख्य लेखापरीक्षक दिलीप सूर्यवंशी यांच्या

...पृष्ठ क्र. ७ वर

## लष्कर युध्दतज्ञ व पत्रकार- विनायक परबांचे 'ऑपरेशन सिंदूर' वर भाषण

**रविवार २५ मे २०२५ला विनायक परब, एक प्रसिद्ध युद्धतज्ञ व पत्रकार यांचे 'ऑपरेशन सिंदूर' यावर तपशीलवार असे भाषण पार्ल्याच्या 'केशवराव घैसास' सभागृहात सादर झाले. प्रेक्षकात पार्ल्याचे आमदार व माजी नगरसेवक (सर्व भाजपचेच) असल्यामुळेच की काय मोदीजींच्या हल्लीच्या हास्यास्पद असलेल्या भाषणाचीही त्यांनी स्तुती केली, ती तिथली गरज असावी. (मेरे खूनमे गरम सिंदूर बह रहा है वगैरे.)**
त्यांनी सांगितलेले महत्वाचे पॉईंटस् (त्यातील गुप्ततेचा मान राखत) खालीलप्रमाणे होते,

१. हे युध्द नव्हते तर तो एक चार दिवसांचा भारत-पाक संघर्ष होता.

२. संपूर्ण संघर्ष तंत्रज्ञानावर केला गेला व जवळपास ७५% हे सर्व सॉफ्टवेअरनेच चालवले गेले (कृत्रिम तंत्रज्ञानाने नाही) ...पृष्ठ क्र. २ वर

अंतरंग



संघ व भाजपची हुकूमशाही मोडून काढण्यासाठी, जनतेला उभे करावेच लागेल!
...विश्वास उटगी
पृष्ठ क्र. ३



शस्त्रसंधीनंतरचं कवित्व....
- राजन राजे
पृष्ठ क्र. ८

पद्मविभूषण डॉ. जयंत नारळीकर आज काळाच्या पडद्याआड गेले... २० मे २०२५
सतीश चाफेकर
पृष्ठ क्र. ९



मुंबईकर कोकणी चाकरमानी
पृष्ठ क्र. १०

# लष्कर युध्दतज्ञ व पत्रकार– विनायक परबांचे 'ऑपरेशन सिंदूर' वर भाषण ...पृष्ठ क्र. १ वरुन

३. यात लष्कराच्या महिलांनी मुख्यत्वेकरून ठरल्या गेलेल्या त्या नऊ लक्ष्यांवर मिसाईल डागणे, हे काम केले (त्यात ८०% स्त्रिया होत्या), हे आपल्याला अभिमानस्पद वाटेलच, अशी कामगिरी होती.

४. चार प्रकारची मिसाईल वेगवेगळ्या प्रकारची अंतरे व क्षमता ओळखून निवडली गेली ज्यात एक 'ब्रम्होस' होते व बाकी हॅमर व इतर. ही सर्व आकाश ते जमीन अशीच मिसाईलस् होती व त्यातील सर्वांनी लक्ष्यभेद करून पाकिस्तानला क्षतिग्रस्त करून टाकला पण यात कुठलेही लक्ष्य लष्कर किंवा नागरिक वस्ती/शाळा किंवा हॉस्पिटले हे नव्हते, हे विशेष.

५. लष्कराने त्याची सर्व माहिती वेळोवेळी पत्रकार परिषदांमधे देऊन जगाला सत्य सादर केले. यात एक होते विदेश सचिव मिसरी व बाकी दोन महिला लष्कर अधिकारी, ज्यात एक मुस्लिम धर्मीय सोफिया कुरेशी व दुसरी पंजाबी. दोघीही आज खूप प्रसिद्ध झाल्या आहेत व ज्यांचा आपल्याला अभिमान आहे. अशा एकूण नऊ पत्रकार परिषदा घेतल्या गेल्या, ज्यातील भाषा व टोन हे व्यवस्थितपणे व जपून वापरले गेले.

६. हा संघर्ष आपण तीन दिवसात संपवला व देशाला कमीत कमी क्षतिग्रस्त केले पण तरीही पाकने सीमेनजीक सतत गोळीबार करत आपले बरेच नुकसान करण्याचा प्रयत्न केला व त्यात आपले काही लोकही मारले गेले.

७. पाकिस्तानने तुर्की बनावटीचे कित्येक हजार ड्रोन आपल्यावर डागले पण एकही ड्रोन कुठेच पडू दिला गेला नाही व याचे सर्व श्रेय एस–४००, या प्रणालीला दिले गेले पाहिजे, जी रशियन बनावटीची आहे. ही आपण घेऊ नये यासाठी अमेरिकेने बराच थयथयाट केला होता.

८. भारताने तीन प्रकारची विमाने यावेळी आक्रमणासाठी वापरली ज्यात मिग, मिराज व राफेल ही होती ज्यावरून ही मिसाईल अचूकपणे फेकली गेली.

९. भारताने सर्व युध्द साहित्यात भारतीय भागांचा जास्तीत जास्त वापर करण्याचा प्रयत्न केला ज्यामुळे आपण उद्या आत्मनिर्भर होऊ शकू. आज त्याचे प्रमाण साधारण ३०–३५% आहे.

१०. या संघर्षाच्या काळातही आपली बाजू परराष्ट्र खात्यात असलेले अंदाजे तीनशे तज्ञ वेगवेगळ्या देशांशी संवाद साधून होते, जे भारताची बाजू जगाला सततपणे सांगत होते.

११. यातील भारतीय बाजूची हानी अजुन हाती आलेली नाही (पण काही परदेशी न्युज चॅनेल सतत आपले राफेल क्षतिग्रस्त झाल्याच्या बातम्या देत होते पण आपल्या लष्कराकडून त्याचा दुजोरा आलेला नाही). परब साहेब यांचे म्हणणे पडले की जर राफेल पडले असते तर पाकने बराच आरडाओरड केली असती, जी झाली नाही.

१२. नऊ दहशतवादी अड्ड्यातील जवळपास तीनशेच्या वर क्टीव्ह पाकिस्तानी अतिरेकी ठार झाले असल्याची माहिती लष्कराने दिली.

१३. भारतीय लष्करानुसार आपण आपले ध्येय साध्य केले व त्यात संपूर्ण विजय मिळवला.

१४. इंदिरा गांधी यांच्या बांगलादेश युध्दाचा संदर्भ टाळून व भाजपीय नेत्यांना आवडणार नाही, पण बोलतो असे म्हणत ते म्हणाले की इंदिराजींनी सिक्कीम भारतात राखण्यात जे यश मिळवले, ते अतुलनीय होते.

वरील सर्व गोष्टी भारतीय लष्कराच्या वेबसाईटवर आणि काही युट्यूबवर सहज उपलब्ध आहेत व लोकांनी अधिक माहितीसाठी ते जरूर पाहावे.




मी एक प्रश्न विनायक परब यांना विचारला शस्त्रसंधीत डोनाल्ड ट्रम्प यांचा कितपत हात आहे? तसेच जे ते सतत म्हणतात की व्यापाराच्या भितीनेच होणारे युध्द संपवले गेले, हे किती व कसे खरे आहे?. यावर ट्रम्प यांचा त्या शस्त्रसंधीत काहीच संबंध नाही, हे उत्तर परब साहेबांनी दिले मग त्यावर मी पुढे विचारले की यावर भारताकडून कोणीच नकार/निषेध का केला नाही? त्यावर परब साहेब म्हणाले की आपल्या विदेश मंत्र्यांनी हे त्यांच्या मुलाखतीत सांगितले आहे.

आपल्या प्रेझेंटेशनमधे परब साहेब म्हणतात की आपण पाकच्या राजधानीवरही हल्ला करू शकतो, ही आपली शस्त्र–सिद्धता या संघर्षात पूर्णपणे दाखवली गेली व मगच पाकिस्तान तहाला तयार झाला. मला प्रश्न पडला की, जेव्हा एखादा सामना अनिर्णित राहातो मग ते 'ऑपरेशन' यशस्वी कसे ठरले? हा प्रश्न तिथे आलेल्या भाजपीय प्रेक्षकांना पचला नसता पण तो माझ्या जिभेवर आला होता. विरोधात असताना ज्याबद्दल अखंड बडबड केली गेली ती संधी सत्ताधारी असताना का सोडली गेली? डोनाल्ड ट्रम्प यांच्यावरच्या प्रश्नांवरही बरेच लाल डोळे माझ्यावर वटारले गेले होते. सुस्थितीत असलेला मध्यमवर्गीय आज पूर्णपणे भाजपीय झालेला दिसला व हे त्याचेच द्योतक होते पण लवकरच त्यांचा भ्रमनिरास होईल, याची मला खात्री आहे.

आता विदेश मंत्री जयशंकर यांचा व्हिडिओ मी पाहिला व तो तुम्हीही बघा की तो काय सिद्ध करतो आहे? त्या व्हिडिओत जयशंकर तर 'त त प प अं त त प प' या भाषेतच उत्तर देताना दिसले व आता हे ट्रम्पवरचे प्रश्नही जर भाजपीय लोकांना इतका घाम आणत असतील, तर आपण काय बोलणार? हेच मोदीजी तेव्हा मनमोहनसिंगांच्या काळात अगदी अमेरिका/पाकिस्तान यांच्यावर स्वैर टीकाटिप्पणी करत आरोप करत असत पण त्यावेळेस त्यांना देशद्रोही किंवा पाकिस्तानची भाषा बोलणारे, असे कोणीच म्हटले नव्हते पण आज तेच होत आहे व सर्व गोष्टी गुपितच ठेवल्या जात आहेत. आज सर्व प्रश्न टाळले जातात,मग संसद अधिवेशन असो की, पंतप्रधानांची पत्रकार परिषद असो की पंतप्रधान त्या हुतात्म्यांच्या घरी जाणे असो. पण त्यांचे बाकी कार्यक्रम अगदी छान व नेहेमीप्रमाणेच सुरू असतात अगदी त्यांचे हास्यविनोद, मजाकिया अंदाज सर्वकडे काठोकाठ भरलेला असतो. हल्लीच नीती आयोगाच्या बैठकीत व नंतर स्वपक्षीय राज्य सरकारांच्या बैठकीत व दाहोद,गुजरात येथेही तेच दिसून आले. ऑपरेशन सिंदूर झाले कारण २६ पतींना डोक्यात गोळ्या घालून ठार केले गेले पण पंतप्रधान फक्त प्रचारसभेत 'रक्तातल्या गरम सिंदूरबद्दल बोलतात व लग्नाच्या पेहेरावात वावरतात, हे कुठेतरी हुतात्म्यांचा अपमान झाल्यासारखे मला वाटत राहाते. खरेच ते आज पंतप्रधानपदाची गरिमाच पूर्णपणे घालवून टाकत तर नाहीत ना?

आता 'काश्मीर फाईल्स' बनवणारा तो विवेक अग्निहोत्री म्हणतो की, पाकिस्तान व चीनपेक्षाही ते डावे नक्षलवादी व इस्लाम हेच भारताचे खरे मोठे शत्रू आहेत आणि यावर कुठलाच भाजपीय नेता काही बोलत नाही. बरेच शिष्टमंडळातले नेते आज मुस्लिम आहेत, हे विसरून चालणार नाही.

लष्कराच्या पत्रकार परिषदा त्यानंतर खूप गाजल्या व सर्व देशात त्या पाहिल्या गेल्या पण आपण हे इतके बचावात्मक धोरण आज का घेतले आहे व इतक्या लगेच शस्त्रसंधी का केली, याचे मात्र कोणीही उत्तर आजही देत नाही. पाकने तर शस्त्रसंधीनंतरही हल्ले थांबवलेच नव्हते पण मग तेव्हाही आपण गप्पच राहिलो होतो. 'व्यापारी सैनिकाहून हुशार असतो' ते हेच का? हे असे कुठला विजयी देश करतो? पाकिस्तान तर खुलेपणाने आम्ही राजनैतिक चर्चेत जिंकल्याचे सांगतो आहे वर त्या भेकड लष्कर प्रमुखाला 'फिल्ड मार्शल' ही पदवीही दिली गेली पण मोदीजी भारतातल्या लष्कर प्रमुखांचे तर नावही घेत नाहीत, इतके त्यांना का असुरक्षित वाटते?

विनायक परब म्हणाले की हा 'भारत–पाक संघर्ष' होता मग यात आम्ही पाकचे कंबरडे मोडून त्यांना गुडघ्यावर आणले,मग लगेच पाकव्याप्त जम्मु–काश्मीर, सिंध व बलुचिस्तान हे भाग का स्वतंत्र केले गेले नाहीत? यापुढे पाकिस्तान दहशतवादी कारवाया करणार नाहीच, याची काय हमी आहे? बरं, दोन डी.जी.एम.ओ. दरम्यान नक्की काय ठरले? कारण आजही काश्मीर अशांतच आहे व लष्कर तेथील छुपे दहशतवादी मारतच आहेत. त्यात मग आपले कित्येक सैनिकही कामी येत आहेत. या संघर्षात आपले किती नुकसान झाले, यावर विनायक परब यांनी उत्तर देणे टाळले पण ते म्हणाले की 'राफेल' विमान नक्की पडलेले नाही कारण तसे जर झाले असते तर पाकिस्तानने त्याचा गाजावाजा केला असता. आता त्या विवेक अग्निहोत्रीने या सत्यघटनेवर 'पहेलगाम फाईल्स' जरूर काढावा म्हणजे काश्मीरवरचे त्याचे खरे प्रेम सिध्द होईल. आज त्याचातरी 'विवेक' जागा आहे का?

आभार.

*वासुदेव पुरूषोत्तम बेहेरे.*

# संघ व भाजपची हुकूमशाही मोडून काढण्यासाठी, जनतेला उभे करावेच लागेल!

## ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ विश्वास उटगी यांनी 'कृष्णार्पणमस्तु'शी बोलताना, आपले परखड मत मांडले...

**काँग्रेस पक्षात प्रवेश करावा, असे का वाटले?**

● मी बँकेत नोकरीत असताना, जयप्रकाश नारायण यांचे आंदोलन पाहिले, अनुभवले व समजून घेतले. १९७१ला इंदिरा गांधी यांनी, केवळ पाकिस्तानशीच नाही; तर, अमेरिका या 'सुपरपॉवर'शी टक्कर देऊन, बांगलादेश मुक्ती-संग्राम यशस्वी घडवून आणला. हे 'रॉ'चे ऑपरेशन होते. काँग्रेसने व अर्थात पंतप्रधान इंदिरा गांधी, देशात महत्त्वाची भूमिका बजावत असताना, सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार व विकास करण्यासाठी अनेक महत्त्वाच्या निर्णय प्रक्रियांचा अभ्यास करण्यात मला रस होता. बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे, हा एक ध्यास होताच. या अर्थकारण व राजकारणाच्या विरोधात जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखालील बडी आघाडी काम करीत होती, हे लक्षात आले. अमेरिकेच्या आशियातील भू-राजकीय राजकारण व अर्थकारणाला इंदिरा गांधी शह देऊ शकतात; मात्र, विरोधी शक्ती अमेरिकेचे धोरण, जाणीवपूर्वक किंवा अजाणतेपणी पुढे रेटत आहेत, हे राजकारण लक्षात आले. याच प्रक्रियेत आणीबाणी जाहीर झाली. माझ्या आकलनानुसार, परकीय शक्तीचा भारतातील वावर व हस्तक्षेप रोखणे हाच खरा उद्देश होता; मात्र, संजय गांधींबरोबरील शक्ती नी त्याचा गैरवापरही गेला. वीसकलमी कार्यक्रम हा मला आकर्षित करीत होता. यांतील अनेक बाबी आजही त्याच्याशी संबंधित आहेत. मी जरी बँक कर्मचारी चळवळीत, सर्व स्तरांवर पुढारीपण केले असले तरी, काँग्रेसची Centre of Left धोरणे महत्त्वाची वाटत होती. निवडणुका व राजकीय पक्षात प्रवेश करुन, पदे मिळवायची असे कधीही वाटले नाही... पण, डावे पक्ष व काँग्रेस यांनी एकत्र काम केले पाहिजे, असे सारखे मत प्रदर्शन करीत असे. कारण, साम्राज्यवादी अमेरिका व वित्त-भांडवली व्यवस्थेची व्यूहरचना याचा अभ्यास करताना, भारताला का टार्गेट केले जात आहे, हे समजत होते. **काँग्रेस पक्षाची सत्ता जाऊन, ११ वर्षे, मोदींची हुकूमशाही सत्ता, भारताचे किती नुकसान करीत आहे, हे जाणवल्यानंतर व डाव्या शक्ती अजूनही शहाणपण शिकायला तयार नसल्याने, काँग्रेस पक्षात प्रवेश करण्यासाठी आमंत्रण मिळाले आणि मी, २७ मे-२०२५ रोजी, काँग्रेस पक्षात प्रवेश केला देशातील राजकारणात व अर्थकारणात प्रचंड बिघाड होत आहेत. मुख्यतः संविधान व लोकशाही-संरचना मोडीत काढणे, हा संघ व भाजपचा अजेंडा राबविला जात असताना, काँग्रेस पक्षात प्रवेश करुनच काही प्रश्न मोठ्या प्लॅटफॉर्मवरुन हाताळता येतील असे वाटते. पुरोगामी विचारांची ताकदवान फळी उभी करणे आवश्यक आहे. काँग्रेस ने अर्थव्यवस्था व विशेषतः बँका विमा भांडवल बाजार, यावर भर देऊन 'MPCC'चे काम करा, ही अपेक्षा व्यक्त केलीय. हा माझा अभ्यासाचा विषय असल्यानेच, मी आता कामाला लागलो आहे.**

**पक्षाचे नवनिर्वाचित नेते म्हणून, भविष्यात**

देशाच्या स्वातंत्र्यानंतर, गेल्या ७५ वर्षांतील अर्थव्यवस्था आणि त्यात होणारे चढउतार पाहिल्यास, सहकारी बँका केंद्र सरकारने तसेच, रिझर्व्ह बँकेने घेतलेल्या निर्णयांमुळे डबघाईस आल्या, बुडाल्या. याला सर्वस्वी बँकेच्या संचालक मंडळाला जबाबदार धरण्यात येत असले तरी, विजय मल्ल्या/निरव मोदी/मेहुल चोक्सी यांनी अर्थव्यवस्थेला लावलेला चुना आणि रिझर्व्ह बँकेचे वरिष्ठ अधिकारी बेमालुमपणे यातून सटकले. यामुळेच, माध्यमवर्गीय समान्य माणूस भरडला गेला. यात राजकारण नव्हे; तर, अर्थकारण महत्त्वाचे आहे. हे अर्थकारण बिघडले तर, पाच ट्रिलियन डॉलर्सची घोषणा केवळ कागदावरच राहते. यामध्ये दहा टक्के मूठभर धनदांडग्यांच्या भल्यासाठी, १४० कोटी भारतीयांना वेठीस धरलं जातंय !!!

**काँग्रेसला उभारी देण्यासाठी, काय प्रयत्न कराल?**



● मुंबईत व राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात, या विषयावर प्रबोधन व प्रचार तसेच, जिथे आंदोलने उभी करणे आवश्यक आहे, तिथे काँग्रेसच्या नेतृत्वाखालील आंदोलन करावे, हा प्रयत्न नक्कीच करणार.

**ठाणे, मुंबई, रायगड व राज्यातील परवडणाऱ्या घरांसाठी असलेली जमीन, बिल्डरांना कवडीमोल भावाने विकण्याचे बेकायदा कृत्य, महाराष्ट्र शासनाकडून सुरु असून, राज्यकर्त्यांनी मुंबई विकायला काढलीय का?**

● परवडणाऱ्या घरांची चळवळ महत्त्वाच्या टप्प्यात आहे. फडणवीस सरकारने, २०१४ पासून अनेक बेकायदेशीर अध्यादेश काढले आहेत. मुंबई व 'MMRD'तील शासकीय जमिनी बेकायदेशीररित्या अदानी समूह व अन्य बिल्डर समूहाला कायदा धाब्यावर बसवून दिल्या आहेत. मोठे आंदोलन उभे करण्यासाठी आता, नव्याने प्रयत्न करावे लागतील. मात्र, २०१९ पासून मुंबई उच्च न्यायालयात या विषयावर १२ याचिका दाखल आहेत. मुख्य न्यायाधीशांपुढे सुनावणी लवकर व्हावी, हा आता ताबडतोब प्रयत्न करावा लागेल. या चळवळीत सर्व संघटना उतरल्या तर, सरकारला सळो की पळो करता येईल.

**भारतातील ठेवीदार आणि गुंतवणूकदार सुरक्षित नाहीत, याबाबत नुकतेच आपण, एका भाषणात विदारक चित्र मांडलेले आहे. या असुरक्षित अर्थकारणाला नेमकं जबाबदार कोण?**

● सहकारी बँकांविषयी भाजप सरकारचे धोरण, ठेवीदारांना पाच पर्यंतची रक्कम द्या व बँक बंद करा अशी आहे. **दर महिन्याला एक बँक बुडविणे हा जणू धंदा झाला आहे. 'DICGC' कायदा, कलम १६ चा अर्थ असा आहे की, बँक पडली तर, ठेवीदाराला शंभर टक्के रक्कम परत केली पाहीजे. असे असताना, कलम १६ चा Conflicting Clause कलम, १७ ऑगस्ट-२०२१ मध्ये सरकारने सुधारणा करुन, पाच लाखांपर्यंतची रक्कम मिळेल, असे केले. पाच लाखांपुढील ठेवीदारांची ठेव रक्कम कुठे जाते? याकरिता रस्त्यावर उतरुन, ठेवीदारांकरिता लढा दिला गेला पाहीजे आणि न्यायालयातील लढाईदेखील करायला हवी. 'Bank Depositors Protection Welfare' या संस्थेमार्फत, मी ही जबाबदारी स्विकारली आहे. ही लढाई व्यापक करण्यासाठी सर्वांनी एकत्र यायला हवे.**

**आगामी महापालिका निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर, काँग्रेसच्या वाट्याला जास्तीतजास्त जागा येण्यासाठी कोणती रणनीती आखाल?**

● ज्येष्ठ नेतृत्वाखालील समिती यासाठी प्रयत्नशील आहेच. मी प्रचारात सहभागी असेन.

**काँग्रेस पक्षात प्रवेश करण्यासाठी उशीर झाला, वास्तविक तो आधीच करायला हवा होता, असं वाटतं का?**

● मी राजकारणात व अर्थकारणात होतोच... पण, निवडणुकीचे राजकारण व त्यासाठी आवश्यक तो पैसा या अभावी कधी विचार केला नाही. पण आता, संघ व भाजपची हुकुमशाही भारताला खूप मागे नेत आहे. विरोध करायला जनतेला उभे करावेच लागेल. काँग्रेसची गरज आहेच.

**अर्थतज्ज्ञ म्हणून, आपली राज्यभरात असणारी ओळख, काँग्रेसला भविष्यात किती उपयोगी ठरेल, असं आपल्याला वाटतं?**

● मी काँग्रेसमध्ये याच मुद्द्यावर प्रवेश केला आहे. खूप काम करायला मिळेल असे वाटते.

**गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न अजूनही भिजत पडलाय. अशावेळी 'कामगार संघटना संयुक्त कृती समिती'चे निमंत्रक आणि 'निवारा अभियान'चे जनरल सेक्रेटरी या नात्याने, कोणती पाऊले उचलाल?**

● मी, कृतीसमितीमध्ये नेतृत्वात नसलो तरी, सर्व संघटनांबरोबर सख्य आहेच. 'निवारा अभियान, मुंबई' याचे नेतृत्व मीच करीत आहे. न्यायालयीन लढाई व मुंबई ठाणे परिसरात आता सभा संघटित करण्यात पुढाकार घेईन.

# नैसर्गिक जैवविविधता आणि जीवसृष्टींचे प्रमाण तपासण्यासाठी, ठाणे शहरातील सर्व तलावांचे ऑडीट करण्याची 'धर्मराज्य पक्षा'ची मागणी



**ठाणे (प्रतिनिधी) :** ठाणे शहरातील घोडबंदर मार्गावर असलेल्या कावेसर परिसरातील, तब्बल १५० वर्षे जुने असणाऱ्या अतिप्राचीन अशा तलावाचे, ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमातून सुशोभीकरण करण्यात येणार आहे. या कावेसर तलावाच्या सुशोभीकरणाचे भूमिपूजन, नुकतेच संपन्न झाले. मात्र, या सुशोभीकरणामुळे तलावातील आणि तलाव परिसरातील जैवविविधता नष्ट होणार असून, पर्यावरणीय ऱ्हासाबद्दलचा गंभीर धोका निर्माण होणार आहे. या तलावाच्या परिसरात, अत्यंत जुनी झाडे असून, अनेक स्थलांतरित पक्षी, सस्तन प्राणी, सरपटणारे प्राणी, उभयचर प्राणी, विविध प्रकारची फुलपाखरे, ड्रॅगनफ्लाय, मधमाशा आणि अनेक दुर्मिळ कीटक यांचा मूळ अधिवास आहे. कावेसर तलावाच्या प्रस्तावित सुशोभीकरणामुळे, भविष्यात पर्यटकांची वाढती संख्या लक्षात घेता, येथील मूळ अधिवासातील वन्यजीव धोक्यात येण्याची दाट शक्यता असल्याने, नैसर्गिक जैवविविधता आणि जीवसृष्टींचे प्रमाण तपासण्यासाठी, **ठाणे शहरातील सर्व तलावांचे ऑडीट करण्याची मागणी, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने एका पत्राद्वारे करण्यात आली आहे. दरम्यान, वाढत्या मानवी रहदारीमुळे कावेसर तलावाचा परिसर प्रदूषित होणार तर आहेच, त्याचबरोबर ठाणे महानगरपालिका क्षेत्रा-तील बहुसंख्य तलाव आणि तेथील सुशोभीकरणाचा पूर्वानुभव पाहिल्यानंतर, कावेसर तलाव धोक्यात येऊन, निसर्ग आणि पर्यावरणाची प्रचंड हानी होणार आहे.** याच पार्श्वभूमीवर 'धर्मराज्य पक्षा'चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या उप-प्रादेशिक अधिकारी यांना पत्र लिहून, मे महिन्यात सलग तिसऱ्यांदा, सिद्धेश्वर तलावातील मासे मृत्युमुखी पडल्याच्या दुर्दैवी घटनेची आठवण करुन देत, सिद्धेश्वर तलावाच्या संपूर्ण काठावर, अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या झोपड्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांनी केलेल्या प्रदूषणामुळेच, तलावा-तील माशांचा मृत्यू झालेला असून, ठाणे महानगरपालिकेचे प्रदूषणमुक्तीचे सर्वप्रकारचे प्रयत्न फोल ठरले असल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. तसेच, ठाणे शहरातील घोसाळे तलाव हा, दुर्मिळ कासवांचे नंदनवन मानला जातो. त्यामुळे, या तलावातील कासवांचे संवर्धन करुन, घोसाळे तलाव कासवांसाठी संरक्षित म्हणून घोषित करण्यात यावा, अशी मागणी 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने काही दिवसांपूर्वी ठाणे महापालिका प्रशासनाकडे करण्यात आली होती, याकडेही नितीन देशपांडे यांनी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या उप-प्रादेशिक अधिकाऱ्यांचे, आपल्या पत्रातून लक्ष वेधले आहे. **दरम्यान, याआधीच विकासाच्या नावाखाली, ठाणे शहराची काँक्रीटच्या वाढत्या जंगलांमुळे वा-ताहत झालेली असतानाच, निदान यापुढे तरी, ठाणे शहरातील जो काही उरला-सुरला निसर्ग आहे, तो अबाधित ठेवण्यासाठी, वृक्षतोडीवर कायमस्वरुपी बंदी आणण्यासोबतच, सुशोभिकरणाच्या नावाखाली, तलाव परिसरातील काँक्रीटीकरण पूर्णतः बंद करावे, ठाणे शहरातील सर्व तलावपरिसरातील जैवविविधतेचे योग्य ते मॅपिंग करुन, बेसलाईन डाटा तयार करावा. पाणथळ जागेच्या बफर झोनमध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम होऊ नये याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व तलावांतील नैसर्गिक जैवविविधता व तलावांमध्ये अस्तित्वात असणाऱ्या सर्वप्रकारच्या जीवसृष्टीचे प्रमाण, याचे तात्काळ ऑडीट करुन, ते ठाणे महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करतानाच, सर्वसामान्य ठाणेकर नागरिक व पर्यावरणप्रेमींच्या माहितीसाठी ते प्रसिद्धीमाध्यमांद्वारे प्रकाशित करण्यात यावे, अशी आग्रही मागणी 'धर्मराज्य पक्षा'चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी, आपल्या पत्रातून शेवटी केली आहे.**

---

पश्चिम अफ्रिकेतील छोटासा, गरिब देश... नावही ऐकलेलं नसेल अनेकांनी, 'बुर्किना फासो.' बातम्यांमध्ये पाहाल तर, तिकडे अत्यंत कठीण; पण, गरजेची राजकीय उलाढाल सुरु आहे; मात्र, आपल्यासारखी नाही, त्यांची चांगल्या अर्थाने सुरु आहे!

याच राजकीय उलाढालीतून आलेला एक निष्कर्ष म्हणजे, त्यांनी एप्रिल-२०२५ मध्ये एक क्रांतिकारक घोषणा केली...

या देशात आता शिक्षण पूर्णतः मोफत असेल, पहिलीपासून पदवीपर्यंत... (शिष्यवृत्ती, वसतीगृहे, दोनवेळचं जेवणसुद्धा सरकारकडून)

पश्चिम आफ्रिकेतील हा देश, सगळ्याच निकषांवर 'गरीब' मानला जातो. पण, लोकांचा आत्मसन्मान प्रचंड. 'बुर्किना फासो' या नावाचाच अर्थ आहे, प्रामाणिक लोकांची भूमी कायम अस्थिरतेत, लढ्यांत आणि गरिबीच्या सावलीत जगणाऱ्या या देशाने, आज जगाला एक आरसा दाखवला आहे. जगाला सोडा पण, आपल्याला तर नक्कीच. भारतात एकूण शिक्षणक्षेत्रात जितका खर्च होतो, त्यातला ३९% खर्च हा थेट कुटुंबांकडून (पालकांकडून) केला जातो. म्हणजे, शाळेची फी, खासगी शिकवण्या, वह्या-पुस्तकं, वसतिगृह, कॉलेज फीज वगैरे. म्हणजे, सरकार कमी खर्च करतं आणि जबाबदारी पालकांवर टाकली जाते.

दुसरीकडे, बुर्किना फासोमध्ये १०% पेक्षाही कमी खर्च पालकांकडून होतो. कारण, सरकार शिक्षणासाठी सर्वस्वी जबाबदारी घेते; फीज, जेवण, वसतिगृह, सगळं मोफत... आणि, आता तर, युनिव्हर्सिटीपर्यंत मोफत शिक्षण केलं आहे.

पण, आपल्या राजकीय वातावरणाचा सर्वात मोठा फटका म्हणजे, या मूलभूत गोष्टींवर चर्चा होईल, याची कोणतीही चिन्हे नाहीत !!!

*....गौरव सोमवंशी*

---

सरकारविरोधी एखादी पोस्ट टाकली तर सर्वात जास्त प्रमाणात घाणेरड्या शिव्या देणाऱ्या मराठा समाजासाठी आजची पोस्ट !

काही समाज एकच घटनेने शहाणे होतात, काही समाज थोडे अनुभव आल्यावर आणि कधीच सुधारत नाही तो म्हणजे मराठा समाज !

एवढा विरोध होत असतानाही मराठा समाजविरोधात गरळ ओकणाऱ्या लोकांना मंत्रिपद दिल जात आणि तरीही काहीही न करू शकणारा समाज म्हणजे मराठा समाज होय ! (टीप : सर्वात जास्त आमदार मराठा समाजाचेच आहेत.)

हिंदू म्हणून दंगलीमध्ये भाग घेऊन अंगावर सर्वात जास्त केसेस घेऊन आयुष्य बरबाद करण्यात सर्वात जास्त संख्या असणार समाज म्हणजे मराठा समाज होय !

आरक्षणाच्या नावाच तात्पुरत चॉकलेट देऊन जबरदस्तीने परत ज्याच्याकडून हिसकावून घेतल गेल तो समाज म्हणजे मराठा समाज होय !

९७% दारिद्र्य रेषेखाली समाज असूनही धर्माच्या नावाखाली मूर्ख बनविण्यात येणारा समाज म्हणजे मराठा समाज होय !

पूर्वजांनी कामावलेली सगळा जमीन जुमला विकून, ते पैसे उधळून अजूनही फुकटच्या बढाया मारणारा समाज म्हणजे मराठा समाज होय !

एवढे सगळे वाचूनही जय श्रीराम म्हटल्यावर धर्माच्या नावाखाली नेहमीच मूर्ख बनणार समाज कोणता असेल, तर तो मराठा समाज होय !

लक्षात आहे ना कोरटकर काय म्हणाला होता? ''हे ब्राम्हणांच सरकार आहे. तुम्ही पाहिजेल तेवढे लोक गोळा करा, काहीही होणार नाही!''

एका विशिष्ठ समाजासाठी तुम्ही शुद्रच होता, शुद्रच आहात आणि शुद्रच राहणार !!!


# २७ मे...आपले पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांची पुण्यतिथी!

आधुनिक भारताचे निर्माते म्हणून त्यांची जी कामगिरी आहे ती सर्वांना माहित आहे. परंतु गांधीजी आणि नेहरू यांना फाळणीसाठी जबाबदार धरले जाते, त्या विषयावर नेहरू आणि पटेल यांची मते काय होती, हे जाणून घेणे आज उद्बोधक ठरेल.

**देशाच्या नेत्यांना किती दूरदृष्टी आहे त्यावर त्या देशाचे भाग्य अवलंबून असते. भारताच्या फाळणीची मागणी जेंव्हा करण्यात आली, तेंव्हाच फाळणीच्या परिणामांची साधकबाधक चर्चा सुरु झाली होती. या विषयाची जवाहरलाल नेहरू यांनी १९४४ मध्येच त्यांच्या ''डिस्कव्हरी ऑफ इंडिया'' या ग्रंथात तपशीलवार चर्चा केली आहे. त्यात त्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, ''हिंदू आणि मुस्लिम बहुसंख्यता या निकषावर देशाची फाळणी झाली तर, हिंदू बहुसंख्या असलेल्या भागात औद्योगिकरण झालेले भाग आणि खनिज-संपत्तीने संपन्न असलेले भाग येतील. याउलट मुस्लिम बहुसंख्या असलेले भाग हे आर्थिकदृष्ट्या मागासलेले असतील आणि ते मोठ्या प्रमाणावर परकीय मदत मिळाल्याशिवाय तग धरूच शकणार नाहीत. त्यामुळे विसंगती अशी दिसते आहे की, जे लोक आज वेगळा देश मागत आहेत, त्यांनाच त्याचे गंभीर दुष्परिणाम भोगावे लागतील..'' आज पाकिस्तानची आर्थिकदृष्ट्या जी अवस्था झालेली आहे, ती पाहता नेहरुंचे हे १९४४ मधील लिखाण किती दूरदर्शी आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.**

परंतु ज्या वेळी अखंड भारतात कायम जातीय दंगलीत होरपळत बसण्यापेक्षा फाळणी करणे श्रेयस्कर आहे आणि त्यानंतर आपल्या देशाचा आपण सर्वांगीण विकास करु या निर्णयाला नेहरु-पटेल आले, तेंव्हा त्यांनी गांधीजींच्या विरोधात जाऊनही फाळणीला मान्यता दिली. त्या निर्णयाला काँग्रेस कार्यकारिणीची मान्यता मिळविण्याची जबाबदारी सरदार पटेल यांनी स्वतःहून स्वीकारली आणि त्यांनी कार्यकारिणीसमोर जे भाषण केले त्यात त्यांनी सांगितले की..

**''भारताची फाळणी व्हावी, अशी कोणाचीही इच्छा नाही आणि माझेही हृदय हेलावून गेले आहे. परंतु, आता आपल्याला निवड एवढीच करायची आहे की, देशाचे आपण दोन तुकडे स्विकारायचे की, अनेक तुकडे होऊ द्यायचे... आपल्याला पसंत असो की नसो, पंजाब आणि बंगालमध्ये पाकिस्तान आज प्रत्यक्षात अस्तित्वात आलेलाच आहे. अशा परिस्थितीत मी तरी पाकिस्तान कायद्याने अस्तित्वात यावा, हे जास्त पसंत करीन, कारण त्यामुळे मुस्लिम लीगला अधिक जबाबदारीने वागावे लागेल. स्वातंत्र्य आपल्या उंबरठ्यावर उभे आहे आणि आपल्याला ७५ ते ८० टक्के भारत मिळत आहे आणि आपल्या बुद्धिमत्तेने आपण त्याला बलशाली बनवू शकतो. उरलेल्या भागाचा विकास**



**लीगला करु द्या...''**

आपल्या देशात काय साधनसंपत्ती आहे आणि आपल्या लोकांच्या मेहनतीवर आणि बुद्धिमत्तेवर आपण आपला विकास करून घेऊ शकतो याचा दुर्दम्य आत्मविश्वास असलेले नेहरू-पटेल यांचे नेतृत्व होते आणि त्यांनी फाळणीचे आणि त्यानंतरच्या विकासाचे आव्हान पेलून दाखवले. याचा परिणाम आज भारत विकसित देशांच्या यादीत आहे हा आहे. काँग्रेस नेतृत्व हे १९३० सालापासूनच समाजवाद, पंचवार्षिक योजनांतून विकास, कामगार कल्याण कायदे, संसदीय लोकशाही, जमीनदारी निर्मूलन, स्त्री-पुरुष समानता, अस्पृश्यता निवारण, इत्यादी गोष्टींवर आपले धोरण ठरवून तयार होती आणि देशाला कोणत्या मार्गावर नेऊन विकास करायचा याबद्दल त्यांच्या मनात आराखडे तयार होते. त्यातही समाजवाद, नियोजनातून विकास इत्यादी गोष्टी नेहरु-बोस यांच्या समाजवादी गटाने 'गांधी-आयर्विन' कराराच्या वेळेसच काँग्रेसच्या गळी उतरवल्या होत्या.

**पाकिस्तानच्या बाबतीत पाहिले, तर या सगळ्या गोष्टींचे जणू त्यांच्या नेतृत्त्वाला देणेघेणेच नव्हते. जीना यांचा फाळणी मिळवून घेण्याचा मार्ग केवळ धार्मिक भावना भडकावून, दंगली घडवून आणणे हा होता. त्यांच्या डोक्यात कोणताही विधायक विचार नव्हता, आणि देशाला विकासाच्या मार्गावर कसे पुढे न्यायचे, त्याबद्दल ते अनभिज्ञ होते.**

जेंव्हा भारताच्या फाळणीची मागणी सुरु झाली, तेंव्हा त्यावर झालेल्या चर्चेत फाळणीनंतर निर्माण झालेला पाकिस्तान, हा नवीन देश कृषी आणि औद्योगिकदृष्ट्या मागासलेला राहील आणि त्यामुळे त्याला नेहमी परकीय मदतीवर अवलंबून राहावे लागेल हा मुद्दा वारंवार पुढे येई.

न्यूयॉर्क टाइम्सचे हर्बर्ट मॅथ्यूस यांनी मुस्लिम लीग अध्यक्ष महम्मद अली जीना यांची त्यांच्या फाळणीच्या मागणीवर सप्टेंबर १९४२ मध्ये मुलाखत घेतली होती आणि त्यांनी त्यात मुलाखतीत, हा मुद्दाही उपस्थित केला होता. त्यावर जीना यांनी तो मुद्दा उडवून लावतांना असे म्हटले की,

''अफगाणिस्तान हा लहान देश असूनही तगून आहे. तसेच इराक या देशाची लोकसंख्या तर निर्माण होणाऱ्या पाकिस्तानच्या सात कोटी लोकसंख्येपेक्षा खूपच कमी आहे तरीही तो देश अस्तित्वात आहेच. आम्ही जर आम्हाला मिळणाऱ्या स्वातंत्र्याच्या बदल्यात गरीब अवस्थेत राहायला तयार आहोत, तर हिंदूंना त्यात आक्षेप का आहे?''

**आपण ज्या देशाला जन्म देत आहोत, त्याच्या पुढील वाटचालीबद्दल शून्य दृष्टी असलेल्या नेत्याचे, हे बेजबाबदार उद्गार आहेत... आणि त्यांची पाकिस्तानच्या भवितव्याबद्दलची दूरदृष्टी किंवा भाकीत हेच जर होते, की अफगाणिस्तान आणि इराकच्या पातळीला आपला देश येऊ शकतो, तर आज आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या दिवाळखोर असलेल्या त्या देशांच्या पातळीला जाऊन पाकिस्तानने ते सिद्ध केलेच आहे. केवळ द्वेष आणि धर्मांध राजकारण करुन सकारात्मक उभारणी करता येत नाही, तर त्यातून फक्त अराजक आणि विध्वंसच जन्माला येतो, एवढा धडा यातून आपण घेतला तरी पुरे!**

*...सुनिल सांगळे*

## बर्डे मास्तर

सातारा जिल्ह्याच्या शिराळा पेट्यातील भूमिगत कार्यकर्त्यांमध्ये दादू अप्पाजी बर्डे ऊर्फ बर्डे मास्तर प्रमुख होते. डॉ. सोवनींना लिहिलेल्या पत्रात यशवंतरावांनी बर्डे मास्तरांचा नावानिशी उल्लेख करून त्यांना आवरणं कोणालाही शक्य नसल्याचं मत दिलं आहे. बर्डे मास्तरांचं काम मोठं असलं तरी शिराळा पेट्यातील गैरप्रकाराबद्दल तेच जबाबदार आहेत असं यशवंतरावांचं मत बनलं होतं.

बर्डे मास्तर यशवंतराव चव्हाणांना जुमानत नव्हते, याचं कारण म्हणजे ते चव्हाणांपेक्षा वयाने मोठे होते आणि ते पूर्वी महाराष्ट्र प्रांतिक कॉन्ग्रेसच्या कार्यकारिणीचे सदस्य असल्यामुळे त्यांना अच्युतराव पटवर्धन व एस. एम. जोशी यांच्यासारख्या नेत्यांशी कोणाच्याही मध्यस्थीशिवाय थेट संपर्क साधता येत असे. बर्डे मास्तर अत्यंत धाडसी होते. ते जिवाशी खेळायला सदैव तयार असत. भूमिगतांची चळवळ बदनाम करण्यासाठी सरकारने धंदेवाईक दरोडेखोरांना हाताशी धरलं, तेव्हा तेव्हा त्यांना वठणीवर आणण्यात बर्डे मास्तरांनी महत्त्वाचा वाटा उचलल्याचं दिसतं. सर्वाधिकारी या नात्याने कोणी आपल्याला शिस्त लावण्याचा प्रयत्न केला तर बर्डे मास्तर तो खपवून घेत नसावेत.

– य. दि. फ ड के, 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र', खंड ५, पान १५४ – ५. श्रीविद्या प्रकाशन, १९९७.

‘नवशक्ती’चे माजी संपादक कै. पु. रा. बेहरे यांचे वासुदेव बेहरे, हे चिरंजीव आहेत. रोज अशी एक सडेतोड पोस्ट ते टाकत असतात....त्यापैकीच एक खालील पोस्ट....

# “‘मास्टरस्ट्रोक्सचे मोदीजींनाच वरदान’”....

मोदीजी पंतप्रधान आहेत की, सेल्समन? ते सिंदूरपासून थेट लष्कर, दहशतवादी हल्ला वगैरेपर्यंत सगळ्याच गोष्टींचे मार्केटिंग करत आहेत. जिथे कुठे मतं मिळतील तिथे तिथे जाऊन वाट्टेल ते बोलायचे; तसेच, वेगवेगळे कपडे घालून फोटो काढून मिरवायचे... यांना म्हातारचळ तर लागला नाही ना? इतका ‘फोटोजीवीपणा’ का? रेल्वे तिकीटावरही आता यांचा फोटो...हे सर्व अगदी हास्यास्पद चालले आहे.

**काही लोकांना उपजत ‘मास्टरस्ट्रोक्स’ मारण्याची कला असते, उदाहरणार्थ सचिन तेंडुलकर किंवा आधी सुनिल गावस्कर, महेंद्र सिंग धोनी, वीरेंद्र सहवाग वगैरे...पण, आज राजकारणात फक्त भक्तांचे पापा –हे मास्टरस्ट्रोकस् खेळण्यात निष्णात आहेत. आता हल्लीचेच उदाहरण द्यायचे तर ‘ऑपरेशन सिंदूर’, नंतर झालेली युध्दबंदी, आधी जातीय जनगणनेचा धि:क्कार व त्यानंतर तिचा स्विकार...हे दोन्ही परस्परविरोधी मास्टरस्ट्रोकस् होते किंवा त्याआधी २०१४पासून मोदीजी मास्टरस्ट्रोकस् मारतच होते व मग प्रचारासाठी त्याचा उपयोग खूप भारी होई; पण, त्यांचे विरोधक जे करतात ती सगळी हीन अशी कृत्येच. २०१४ पासून अगदी जनधन खाती, मग नोटाबंदी, जी.एस.टी, ई.डी, इन्कम टॅक्स, सीबीआय, पी.एम.एल.ए. कायदा या गोष्टी ज्या प्रभावीपणे वापरुन मास्टरस्ट्रोकस् मारण्यात आले व वेगवेगळ्या भ्रष्ट ठरवल्या गेलेल्या हजारो विरोधकांना त्यांनी भाजपमध्ये आणून सरकारात सामील केले आणि ‘काँग्रेस–मुक्त’ भारताची एक घोषणाच करुन टाकली...पण, खरे तर त्यांनी काँग्रेस भ्रष्टाचार मुक्त केला. इथे साम्य एकच की, सर्व राष्ट्रीय चॅनेल्सवर रात्री आठ वाजता यायचे आणि काही उद्दिष्टे सांगत, हे विषय सुरू करायचे. काही वेळेस जनतेची माफीही मागण्याची वेळही आली उदा. नोटबंदी, किसान–कायदे, छत्रपतींचा मालवण गडावरचा पुतळा वगैरे... पण, कधीच त्याची लाज त्यांनी बाळगली नाही; कारण, तोच तर यांचा संस्कार होता.**

पी.एम.एल.ए.चा कायदा हा चक्क यु.पी.ए. सरकारनेच केलेला होता; पण, त्याचा प्रभावीपणे वापर करुन मग स्वपक्षीय हीत साधणे, ही कला...हा असाच एक मास्टरस्ट्रोकच होता. २०१४ पासून ते आजतागायत मोदी जे करतात, ते सर्व मास्टरस्ट्रोकच कसे होतात? हे मात्र, आता रहस्य राहिलेले नाही. ‘भकुल्ले’ हे मोदीजींच्या आरती ओवाळताना बेभान होतात व मगच, हा असा शब्द निर्माण होतो. मोदीजींचे प्रत्येक धोरण, मग ते अयशस्वी असले; तरीही, ‘भकुल्ल्यांची पैदास’ हा खरा मास्टरस्ट्रोकच होता, हे पटवून देते; मग त्यासाठी भाडोत्री लोक आणले जातात, जे विषय भरकटवत उलटच काहीतरी बोलत बसतात. बघा जेव्हा ते गुजरातचे मुख्यमंत्री होते व २००५ मुंबई हल्ल्यात ओबेरॉयबाहेर आले व मनमोहनसिंगाना शिव्यांची लाखोली देत होते; तरी पाकिस्तानचा आत्मा किंवा पाकिस्तानधार्जिणे त्यांना ठरवले गेले नव्हते...जितके आज एक जरी प्रश्न विचारला की राहुल गांधी, केजरीवाल किंवा मग ते त्यांचे प्रिय राज ठाकरेही बनून जातात! ...व मग सर्व ‘भकुल्ले’ एक साथ त्या सर्वांना ‘देशद्रोही’ ठरवतात. मध्य प्रदेशातले मंत्री विजय शहा किंवा उपमुख्यमंत्री मात्र, अत्यंत खेदजनक आरोप अगदी देशभक्त जवान मुलीवर किंवा लष्करावर करुन देशाच्या इज्जतीची माती करुन टाकतात, तेव्हा मात्र हे सर्व भकुल्ल्यांचे भाऊ आणि गुरूजी गप्प असतात.

**ऑपरेशन सिंदूरबाबत काल म्हणे मोदीजी म्हणाले की, त्यांचे रक्त आज सिंदूरमय भगवे–लाल झाले आहे मग त्या बिचाऱ्या जसोदाबेनच्या भांगेत अजुनही सिंदूर का नाही? तिला का वाऱ्यावर सोडून दिले गेले?? मोदीजी एवढा मोठा ‘सिंदूरी–संहार’ होऊन आजपर्यंत पहेलगाम सोडा, २७पैकी एकाच्याही घरी साधे भेटायला का गेले नाहीत? तुम्ही गेला नाहीत; मग, ते गृहमंत्रीही व तो जेम्स बाँड डोवल पण गेला नाही, हीच सिंदूरबद्दलची तुमची संवेदना?**

काल एका राष्ट्रवादी नेत्याच्या सुनेच्या हुंडाबळीची बातमी आली व विचार आला की, तो नेता जर मुस्लिम असता तर किती कडवे गुरूजी व नफरती चिंटूंनी ‘लव–जिहादी’ घोषणा देत व मोर्चे/आंदोलने केली असती. या परमपुण्य राष्ट्रवादीतल्या नेत्यांची एकामागोमाग एक प्रकरणे आज बाहेर येतात; पण, भाजपचा एक जण काही बोलत नाही, अगदी महिला आयोगाच्या प्रमुखही तोंड मिटून गप्प व गायब होतात. त्या चित्रा वाघांच्या डरकाळ्या, संजय गायकवाड सरकारात आले तेव्हापासूनच ‘म्याव–म्याव’च्या पुढे जात नाहीत; पण कोणी प्रश्न विचारला की, त्या मग सर्व पत्रकारांवरच तुटून पडत आगपाखड करतात. हे असे यांचे दुतोंडी रूप व दुहेरी व्यक्तिमत्व! राष्ट्रवादी काय किंवा तो एकेकाळी नितीमत्तेच्या गोष्टी करणारा भाजप व शिंदेसेना तशीच वागताना आजही दिसते. आता शिवसेनेचा जन्म झाला तेव्हा हे एकनाथराव दोन वर्षांचे होते आणि बाळासाहेबांपेक्षा त्यांचा काळ आनंद दिघे यांच्याबरोबर जास्त गेला; पण, तरीही पहिल्या दिघे चरित्रावरील सिनेमात ते आनंद दिघे यांच्या मृत्यूस सबंध ठाकरे कुटुंबाला जबाबदार होते, असे ते दाखवतात... मग राज ठाकरे यांच्याशी त्यांची मैत्री जमते व त्यातच आनंद दिघेंवर भाग–२ सिनेमा येतो व त्यात मग पूर्ण संशयाची सुई शिवसेना पक्षश्रेष्ठींवर ढकलली जाते आहे की, नाही मजा. हा दुतोंडीपणा असतो; पण, नियती क्रूर असते व ती बदला घेतच राहाते. आता उध्दव ठाकरे किती बरोबर होते, हे यांना पदोपदी कळत आहे; पण, वळत नाही.

अहो साहेब, तुमचे रक्त ‘सिंदूरमय’ होते तर मग युध्द करून पाकिस्तानचा गाझा करायचा होता ना, मग युध्द–तह का केलात? डोनाल्ड ट्रम्प यांची धमकी आली का? ते तर तसे उघड म्हणत आहेत पण तुम्ही गप्प का? कुठे गेली ती ५६" छाती? का ती फक्त निवडणुकीपुरतीच फुगते? पण कुंकू हे विषारी असते, असे म्हणतात; मग, ते तुमच्या रक्तातून कसे वाहते? या कुंकवाचा उपयोग विवाहित बायकाच करतात; मग, ते साहेबांच्या रक्तात कसे गेले? कालच ते तसे भाषणात म्हणाले, म्हणून आता काळजी वाटू लागली.

**रशियाला शिष्टमंडळ का पाठवावे लागले; कारण, तिथे तर युक्रेनशी युध्द अजुनही सुरु आहे व रशिया हा आपला बरेच वर्षांचा मित्र आहे. सौदी अरेबिया व स्पेनमधील पत्रकारांना उत्तरे देता देता जयशंकर गडबडून गेले होते. त्या सर्वाना तुम्ही का सांभाळत नाही, मोदीजी? याच देशांच्या राष्ट्रप्रमुखांशी तुम्ही गळाभेट घेतली होती ना??**

**२०१४ काँग्रेसमधील भ्रष्ट नेत्यांमुळेच जनतेने काँग्रेस नाकारली. आज तेच सर्व नेते भाजपमधे जाऊन बसून सत्तेचा गैरवापर करत आहेत; मग, भाजपला मत देणे, आता योग्य होईल?**

**उघडा डोळे व बाकरवडी खात, विचारा प्रश्न व बघा काही उत्तरे मिळतात का ते....पण, एखादा मास्टरस्ट्रोक मात्र जरुर मिळेल.**

नमस्कार व आभार....

*...वासुदेव पुरुषोत्तम बेहेरे*

---

अमेरिकेतले ट्वीन–टॉवर्स, दहशतवाद्यांनी व्यवस्थित प्लॅन करुन, २००१ मध्येच पाडले...

अमेरिकेला या दहशतवादी हल्ल्याच्या मागे, ओसामा बिन लादेनच आहे, हे थोड्याच दिवसांत कळले. ओसामा बिन लादेन पाकिस्तानातच राहतो, हेपण अमेरिकेला कळले होते... परंतु, राणा भिमदेवी थाटात, अमेरिकेने ना पाकिस्तानविरुद्ध आगपाखड केली, ना ओसामा बिन लादेनला आक्रस्ताळपणे धमक्या दिल्या. मात्र, अमेरिका सतत ओसामा बिन लादेनच्या मागावर नक्कीच होती.

२०११ मध्ये म्हणजे, जवळजवळ १० वर्षांनी, अमेरिकेने ओसामा बिन लादेनला पाकिस्तानातून अचूक उचलले, हेलिकॉप्टरमध्ये टाकले, एका जहाजावर नेले आणि त्याचे प्रेत समुद्रात फेकून दिले. दहशतवादी हल्ल्याचे उत्तर युद्ध नव्हे; तर, आत घुसून शांतपणे दहशतवाद्यांना मारुन टाकणे आहे, हे अमेरिकेने जगाला दाखवले...

पहेलगामच्या दहशतवादी हल्ल्याचे असे उत्तर, पाकिस्तानमध्ये घुसून भारताने का दिले नाही? याचे स्पष्टीकरण, अजूनही भारतीय जनतेला मिळालेले नाही. जे केले गेले ते सर्व नाटक तर नव्हते? मोदी नावाच्या माणसाची विश्वासार्हता, गेल्या ११ वर्षांत पार रसातळाला गेली आहे, म्हणूनच तर हे प्रश्न मनात येतात ना !!!

*....प्रकाश परांजपे*

# भारताची कीड : गप्प बसलेला मध्यमवर्ग!

वाझहॅट म्हणतात, ''एक साधा चोर आपले पैसे, दागिने, वस्तू चोरतो; पण एक राजकारणी चोर आपले भविष्य, रोजगार, धंदा, आरोग्य, शिक्षण आणि अधिकार चोरतो.'' यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे साधा चोर कोणाला लुटायचे हे ठरवतो, पण राजकारणी चोराला आपणच निवडून देतो, स्वतःला लुटण्यासाठी!

**आज देशात लोकशाही एवढीच शिल्लक आहे की, तिचे कौतुक करण्यासाठी सरकार, राजकारणी आणि पत्रकार नेटाने काम करत आहेत. पण त्याचवेळी भारतातील मध्यम वर्ग आपल्या सुरक्षिततेच्या भ्रमात जगत आहे.**

**''मला काय फरक पडतो?''**

**''माझं काय नुकसान आहे?''**

**''तो चुप आहे, मग मी का बोलू?''**

**''माझं घर, गाडी, पगार आहे ना, मग प्रश्न कशाला विचारायचे?''**

**हीच मानसिकता आपल्याला विनाशाकडे नेत आहे. प्रमोशन मिळेल की नाही, पद उंचावेल की नाही, पेन्शन मिळेल ना?–या विचारांनी मध्यमवर्गीय माणूस 'गप्प बसणे' पसंत करतो, अन्यायाविरोधात आवाज उठवत नाही.**

मध्यमवर्गाचा भ्याडपणा आणि समाजाची अधोगती.

एक दिवस जर घरातील काम करणारी बाई आली नाही तर तिला हजार प्रश्न विचारले जातात, पण पावसाळ्यात गटाराचे पाणी घरात शिरले तरी सामान्य नगरसेवकाला जाब विचारायची हिंमत मध्यम वर्गात नसते.

शिक्षण, आरोग्य, रोजगार, उद्योग हे विषय महत्त्वाचे असताना धार्मिक आणि जातीय मुद्द्यांवरून भांडणारे लोकच राजकारण गाजवत असतात.

उद्योगपतींना नेहमी नफा होतो, पण शेतकरी नेहमी तोट्यात असतो, हे का?

शिक्षण देणारे संस्थाचालक नफ्यात, पण शिक्षण घेणारे विद्यार्थी मात्र कर्जबाजारी का?

राजकारणी निवडून आले की त्यांची पिढ्या पिढ्या सुखात, पण सामान्य माणूस मात्र हतबल का?

हे सर्व माहीत असूनही मध्यम वर्ग मूग गिळून गप्प बसतो.

मध्यमवर्ग स्वतःच्या सुखात हरवलेला!

चारचाकी गाडीवर कर्ज काढून फिरताना त्याला मंत्री चांगले वाटतात. पण...

पेट्रोल दर वाढतात, तरी तो गप्प!

टोल नाके वाढतात, तरी तो गप्प!

वाहनांचा कर वाढतो, तरी तो गप्प!

पण जर, एका महिन्याचा कर्जहप्ता थोडा उशिरा झाला, तर बँकेचे एजंट दारात उभे राहतात.

मग हजारो कोटी कर्ज घेऊन परदेशात पळून गेलेल्या उद्योगपतींना सरकार माफ का करतं?–हा प्रश्न विचारायची हिम्मत मध्यमवर्गीयांमध्ये का नाही?

सरकारने मध्यमवर्गाला गुलाम केलंय, पण त्यालाच त्याची जाणीव नाही!

**सरकारी संपत्ती विकली जातेय, कर वाढवला जातोय, महागाई वाढवली जातेय–हे सगळं लक्षात असूनही मध्यमवर्ग 'माझ्या पगारावर काही परिणाम नाही ना?' याच विचारात असतो.**

**आज ५० वर्षांचा मध्यमवर्गीय माणूस सुदृढ आहे की नाही, हे तपासले जाते, पण ८० वर्षांचा राजकारणी सत्तेत बसण्यास सक्षम आहे की नाही, हे कोणी तपासत नाही!**

**राजकारण्यांची मुले राजकारणात, पण मध्यमवर्गीयांची मुले पुन्हा नोकरच का बनतात?**

**हे सगळं माहित असूनही प्रश्न विचारणार कोण?**

**राजकारण्यांचा स्वार्थ, मध्यमवर्गीयांची मूर्खपणा**

कालपर्यंत ज्यांना शिव्या दिल्या, तेच नेते आज दुसऱ्या पक्षात जाऊन कौतुकाने बोलतात. कारण त्यांना नैतिकतेशी काही देणे-घेणे नाही. पण मध्यमवर्गीय मात्र अजूनही त्यांच्या मागे धावत असतो.

आमदार खासदारांची संपत्ती ५ वर्षांत १००० पट कशी वाढते?

त्यांच्याच कुटुंबातील लोक मोठ्या पदांवर कसे विराजमान होतात?

रुपया घसरतोय, सरकारी संपत्ती विकली जातेय, तरी सरकारला प्रश्न विचारायची हिंमत मध्यम वर्गात का नाही?

मध्यमवर्गीयांनी आता तरी डोळे उघडावेत!

शेतकरी, कामगार हे प्रश्न विचारणार नाहीत. त्यांची रोजीरोटीच एवढी मोठी समस्या आहे की ते संघर्ष करण्यातच हरवून जातात. मग व्यवस्थेला जाब विचारणार कोण?

विरोधाशिवाय लोकशाही टिकत नाही. आज सरकार बेलगाम घोड्यासारखं वागतंय, कारण त्याला लगाम घालणारा मध्यम वर्ग पळपुटा आणि बेजबाबदार झाला आहे.

**''माझं घर, पगार, गाडी सुरक्षित आहे, बाकी मला काही फरक पडत नाही!''**

**ही मानसिकता असली तर उद्या तुमच्या पुढच्या पिढीच्या हातात काहीही उरणार नाही.**

**देशभक्तीची खोटी बढाई थांबवा, प्रश्न विचारायला शिका!**

**''सरकारच्या चुकीच्या निर्णयांविरोधात बोलण्याची हिंमत नसेल, तर स्वतःला देशभक्त म्हणू नका!''**

**मध्यम वर्ग आज ''माझं काय जातंय?'' या मानसिकतेने गप्प बसला आहे. पण उद्या त्याची नोकरी राहील की नाही, हे तो आजही खात्रीने सांगू शकत नाही!**

एक विचार...

दररोज कामावर जाणाऱ्या एका मध्यमवर्गीय माणसाला

बस कंडक्टर, चहावाला, किराणा दुकानदार, दूधवाला, रिक्षावाला हेच भेटतात.

त्याच्या व्यवहारात हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, दलित, सवर्ण याचा काहीही संबंध नसतो.

मग धर्म आणि जातीच्या नावावर राजकारणी लोकांना मूर्ख का बनवतात?

तुम्ही ज्या सहनशक्तीने मंदिराच्या रांगेत उभे राहता, त्याच सहनशक्तीने सरकारला प्रश्न विचारा!

नाहीतर पुढच्या पिढीला अंधारात ढकलण्याची जबाबदारी फक्त तुमची असेल.

## ठाणे महानगरपालिकेच्या कामकाजाची चौकशी करा!

...पृष्ठ क्र. १ वरुन

स्वाक्षरीने, २०२०-२१ आणि २०२१-२२ चा लेखापरीक्षण अहवाल, दिनांक न टाकता ठामपाच्या वेबसाईटवर अनेक अर्जविनंत्या करुन नुकताच प्रसिद्ध झाला. एकदम दोन लेखापरीक्षण अहवाल, वर्ष-२०२५ मध्ये प्रसिद्ध करणे हेच कायद्याचे उल्लंघन नव्हे का? असा प्रश्न उपस्थित करुन, दोन्ही लेखापरीक्षण अहवालांची तुलना केली असता, महापालिकेस ४० वर्षांहून अधिक वर्षे झाली असतानादेखील, १९८२-८३ ते २०१९-२० लेखापरीक्षणात घेतलेले प्रलंबित आक्षेप ७,६०४ इतके असून, २०२१-२०२२ पर्यत ८,०४६ इतके प्रलंबित आक्षेप आहेत; तर, केवळ दोन वर्षांत प्रलंबित आक्षेपांची संख्या कमी होण्याऐवजी, ती ४४२ ने वाढली. ही बाब नक्कीच चिंताजनक आणि गुणवत्ताहीन कामकाजाचे प्रतिक आहे. थकबाकीची वसुली करण्यासाठी, जालीम उपाययोजना न करता, पुन्हा-पुन्हा कर्जाची मागणी करणे ही, करदात्यांची चक्क फसवणूक असून, हे पारदर्शक प्रशासकीय कारभाराचे उदाहरण होऊ शकते का? असा प्रश्न यनिमित्ताने उपस्थित होत असल्याचे नितीन देशपांडे यांनी आपल्या पत्रात थेटपणे अधोरेखित केले आहे. दरम्यान, ठाणे महानगरपालिकेची थकबाकी, गेल्या दोन वर्षांत ४१,९९,९७,९४८/- रुपयांनी वाढली. एकूण थकबाकी ३,७९,५३,३७,२४४/- रुपयांनी पर्यंत वाढली असून, अजून तीन वर्षांचे लेखापरीक्षण प्रलंबित आहे, परिणामी, सदर थकबाकी सुमारे पाच अब्ज रुपयांपर्यंत पोहोचण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब महापालिकेस शोभादायक नक्कीच नसून, यापुढे लेखापरीक्षकाने, वर्षअखेर बँकखात्यात उणे बॅलन्स दाखविणे, BSUP प्रकल्प अंतर्गत गाळ्यांची विक्री न करणे, महसूल जमा न करणे, चुकीच्या मूळ वेतनाने वेतन देयके अदा करणे, प्रवासभत्ता दुबारा अदा करणे, पाणीबिलाची आकारणी न करणे, बँक ताळमेळ-पत्रक तयार नसणे, लेखापरीक्षण दप्तर उपलब्ध करून न देणे, अशा गंभीर उणिवांबाबत, नियम/अधिनियमांतर्गत उल्लंघन केल्याबाबतचे आक्षेप नोंदविले आहेत. ठाणे महानगरपालिकेत चार वर्षांपूर्वी लोकप्रतिनिधींक डून १००० कोटी रुपयांचे कर्ज घेण्याचा प्रस्ताव महासभेत मंजूर झाला होता. त्यावेळेस 'धर्मराज्य पक्षा'कडून निदर्शने करुन, सदर ठरावाला ठाणेकर करदात्यांकडून कडकडीत विरोध केला गेला होता. त्यावर शासनाने कर्ज न देता, काटकसरीचे उपाय सांगितले व कर्जाऊ रक्कमेपासून परावृत्त केले होते. अजून तीन वर्षांचा लेखापरीक्षण अहवाल प्रलंबित आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता, ठामपा प्रशासनास योग्य ते मार्गदर्शन करुन, करदात्यांवर पडणाऱ्या अतिरिक्त आर्थिक बोज्यापासून महापालिकेस परावृत्त करावे आणि तब्बल ४६८ कोटी रुपयांच्या बिनव्याजी कर्जाची मागणी करणाऱ्या, ठाणे महानगरपालिकेच्या कामकाजाची चौकशी करावी, अशी आग्रही मागणी, 'धर्मराज्य पक्षा'चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी, मुख्यमंत्री व राज्याच्या प्रधान सचिवांकडे आपल्या पत्रातून केली आहे.

# शस्त्रसंधीनंतरचं कवित्व....

**एखाद्या चित्रपटाची 'सिक्वेल' (वंशावळ) चालू असते...तसं मग, अचानक लक्षात येतं की, हा पठाणकोट–उरी–पुलवामा, असं वन–टू–थ्री झाल्यानंतरचा 'चौथा एपिसोड' होता; फक्त, त्यात तेरा हजार कि. मी. लांबवर रहाणार्या 'परदेशी मित्राचा हस्तक्षेप', हे एक 'नवंनाट्य' (किंवा हवंतरं 'वगनाट्य' म्हणा) कथानकाला जोडलं जातं...बाकी, सुरक्षिततेतल्या गंभीर त्रुटी वा गुप्तचरविभागाचं दारुण अपयश (पॉलिश्ड भाषेत 'सिक्युरिटी लॅप्सेस व इंटेलिजन्स फेल्युअर), हे मसाला–चित्रपटातल्या 'प्रेमाच्या त्रिकोणा'सारखा कथानकाचा 'ढाचा' तसाच कायम रहातो...थोड्याफार फरकाने बाकी देखील तेच घडत रहातं; बरं, असं का म्हणायचं तर रावळपिंडी, लाहोर, कराची वगैरे 'शत्रूप्रदेश' गोदी–मिडीयातून गलेलठ्ठ पगार लाटणाऱ्या 'अँकर्स'नी**...सत्यसाईबाबांसारखा हवेत हात फिरवून जादुई करामतीने आपल्या पदरात अलगद टाकला असला; तरी, प्रत्यक्षात वस्तुस्थिती तशी कायमच रहाते की, "आपला हक्काचा पाकव्याप्त काश्मीर, सॉरी 'POK', पेहेलगामसारख्या मोठ्या निमित्ताने ताब्यात घ्यायचा; म्हणजेच, नेहरुंची घोडचूक सुधारायचं, तसंच राहूनच जातंय"... ते ही, १९४८च्या तुलनेत आजचं भारताचं लष्करी–सामर्थ्य एवढं प्रबळ व अर्थव्यवस्था तीन ट्रिलियन–डॉलरची झाल्यानंतरही आणि आजचं पाकिस्तान, 'फेल्ड–स्टेट' असतानाही?

...एक ना दोन, तब्बल गेली दहा–अकरा वर्षे आमचं घोडं, ते आणि तिथेच पेंड खातंय...राहीला मोल–ाचा सवाल, असंच कच खाणं चालू राहीलं; तर मग अंधभक्तांचा 'अखंड हिंदुस्थान' अन् दिवसाउजेडी त्यांना पडणाऱ्या त्यांच्या स्वप्नातलं 'हिंदुराष्ट्र', दोन्ही कसं आणि कधि होणार?

...पण, चौथा एपिसोड पुरा होईपर्यंत पेहेलगामचा 'सिंदूर' लावून अंबानींनी आणि चौपट भाडं आकारुन विमान–कंपन्यांनी आपलं उखळ पांढरं करायची संधी मात्र छानशी साधलेली असतेच, हे त्या चौथ्या एपिसोडचं नवं पार्श्वसंगीत किंवा 'शरबत–जिहाद'चा 'भांडवली–अवतार'च...आणि, हो तो ही अर्थातच, शत्रूऐवजी भारतीय जनतेविरुद्ध पुकारलेला!

**...एक गोष्ट बाकी वाखाणण्याजोगी ती म्हणजे, २०२२ पर्यंत सगळ्यांनाच घरं, नोटबंदीनंतरचा भ्रष्टाचारमुक्त भारत, प्रत्येक वर्षी २ कोटी चांगले रोजगार, ५ ट्रिलियन–डॉलर इकॉनॉमी ते थेट २०४७ पर्यंत पूर्ण विकसित भारत वगैरे वगैरे मालिकेतलं एक 'गाजर' भारतीय जनतेपुढे धरण्यास आपले भाजप–संघीय राज्यकर्ते विसरलेले नाहीत...ते म्हणजे, पुन्हा असा दहशतवादी हल्ला झाला; तर, पाकिस्तानला नकाशावरुन पुसून टाकण्याचं 'गाजर'..."निवडणुका लढणं आणि युद्ध लढणं", यातला फरक असतो तो असा!**

...झाली ना, अगदी तीव्रतेनं, इंदिरा गांधींची आठवण...???

***...राजन राजे***
(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)



**नकली ५६ इंची छातीची अखेर पोलखोल झालीच... अकरा वर्षांनी, सोन्याचा मुलामा चढवलेले पितळ उघडे पडले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी, आपल्या शपथविधीलाही बोलावले नाही. भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर हे, विश्वगुरुंना शपथविधीचं आमंत्रण मिळावं म्हणून, तब्बल दहा दिवस ट्रम्पच्या कार्यालयाबाहेर चकरा मारत राहिले; मात्र, भाजपाच्या दोन मालकांपैकी एक असलेले अंबानीशेठ यांनी, भलीमोठी बिदागी दिल्याने त्यांना शपथविधीचं आमंत्रण मिळालं...** अरेरे, विश्वगुरुंच्या शुभेच्छा यामुळे द्यायच्या राहूनच गेल्या. तरीही ते "निर्लज्जम् सदा सुखी" या म्हणीला जागत, न बोलावताही अमेरिकेला गेलेच आणि जागतिक प्रसिद्धीमाध्यमांसमोर, ट्रम्पने त्यांना बेइज्जत केलेच. त्यानंतर, अनधिकृतपणे अमेरिकेत रहात असणाऱ्या भारतीय नागरिकांना, बेड्या घालून मायदेशी पाठविले गेले. आता, ज्यावेळी भारताने पाकिस्तानविरोधातील युद्धात, निर्णायक चढाई केली, तेव्हा अमेरिकेने फटकारताच, विश्वगुरुंना माघार घेण्यास भाग पाडले. प्रश्न हा आहे की, विश्वगुरु आणि त्यांच्या दोन मालकांची अशी कोणती दुखरी नस किंवा चोरीची फाईल, ट्रम्पच्या हातात आहे, ज्यामुळे तो त्यांना सार्वजनिकरित्या अपमानित करतोय... किंबहुना, भारताच्या निर्णयांवर मालक असल्यासारखा अधिकार गाजवतोय? भाजपा, मोदी, शहा आणि राजनाथ सिंग यांनी संसदेत उघडपणे सांगावे की, अशी कोणती मजबुरी आली, ज्यामुळे युद्धविरामाची घोषणा करावी लागली? कोणत्या कारणास्तव अमेरिका आणि ट्रम्पकडून तुम्हाला दररोज अपमान सहन करावा लागतोय?

वयाच्या ३४व्या वर्षी 'पीपल मॅगझिन'ला दिलेल्या मुलाखतीत आणि वयाच्या ४१व्या वर्षी 'ऑपरा विनफ्रे शो'मध्ये डोनाल्ड ट्रम्प यांनी आपण अमेरिकेचे अध्यक्ष बनायला इच्छुक असल्याचे ऐन तारुण्यात निर्देश दिले होते आणि ते तसे खरंच झाले देखील...नुकतीच त्यांनी भविष्यातले 'पोप' म्हणून अख खारसश च्या आधारे स्वतःची पॅपल–गणवेषात एक 'पोस्ट' सादर केली होती...त्या पोस्टमधला विक्षिप्तपणा किंवा अगोचर–आचरट विनोद बाजुला ठेवला; तरी, **भारत–पाकिस्तानमध्ये नुकत्याच झालेल्या शस्त्रसंधिनंतर एक गोष्ट मात्र स्पष्ट झालीय की, अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप, हे 'जागतिक–शांतते'साठी दिल्या जाणाऱ्या 'नोबेल–पुरस्कारा'साठी पात्र ठरलेत; कारण, त्यांच्याच पोस्टनुसार त्यांनी भारत–पाकिस्तानमधील लक्षावधी लोकांचे प्राण, सदर शस्त्रसंधिसाठी मध्यस्थी करुन वाचवलेत...** म्हणजेच, भारत–पाकमधलं संभाव्य आण्विक–युद्ध (Nuclear–थरी) त्यांनी 'मध्यस्थ' या नात्याने (हा भारत–पाकमधील सिमला–कराराचा भंग असला तरी) कौशल्याने टाळलंय!

**...ट्रम्पना जरुर द्या तो नोबेल–पुरस्कार; पण नरेंद्र मोदी, अमित शहा, राजनाथसिंह आणि एस. जयशंकर यांचे राजीनामे मात्र, एकूण शस्त्रसंधिच्या घोळाबद्दल घ्यायला विसरु नका, म्हणजे झालं...जय हो!**

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# पद्मविभूषण डॉ. जयंत नारळीकर आज काळाच्या पडद्याआड गेले... २० मे २०२५

डॉ. जयंत विष्णू नारळीकर त्यांचा जन्म १९ जुलै-१९३८ रोजी कोल्हापूर येथे झाला. गणिताचा वारसा त्यांना त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्याचे वडील विष्णू वासुदेव नारळीकर हे एक प्रसिद्ध गणित तज्ञ होते. वाराणशी येथील बनारस हिंदू विद्यापीठाच्या गणित विभागाचे ते प्रमुख होते. डॉ. जयंत नारळीकरांचं संस्कृतवरही प्रभुत्व आहे. तो वारसा त्यांना त्यांच्या आईकडून मिळाला. त्यांची आई सुमती विष्णू नारळीकर ह्या संस्कृत विदुषी होत्या. डॉ. नारळीकर एक जगद्विख्यात शास्त्रज्ञ तर आहेतच पण ते उत्तम साहित्यिकही आहेत. कारण खगोल शास्त्रात महान संशोधन करण्याबरोबरच त्यांनी मराठी-हिंदी साहित्यांत विज्ञान साहित्याची मोलाची भर टाकली आहे. **डॉ. नारळीकरांचे शालेय शिक्षण वाराणशी येथे झाले. १९५७ साली त्यांनी विज्ञानाची पदवी प्राप्त केली. या परीक्षेत त्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी ते ब्रिटनमधील केंब्रीज विद्यापीठात गेले. तेथे त्यांना 'बी.ए. एम.ए.' ही पदवी मिळाली त्याचप्रमाणे 'पी.एचडी.' देखील मिळाली. त्यांना रँग्लर ही पदवी, खगोलशास्त्राचे टायसन मेडल आणि इतर अनेक बक्षिसे मिळाली. त्यांनी सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ सर फ्रेड हॉईल यांच्या मार्गदर्शनाखाली पी.एचडी. केली. सर फ्रेड हॉईल डॉ. नारळीकरांच्या बुद्धिमत्तेने प्रभावित झाले. त्यामुळे १९६६ जेव्हा हॉईड यांनी केंब्रीज येथे G$इन्स्टिट्यूट ऑफ थिऑरॉटीकल ऍस्ट्रॉनॉमी' नावाची जी स्वत:ची संस्था सुरू केली,** त्यात डॉ. नारळीकरांचाही महत्त्वाचा वाटा होता. डॉ. नारळीकरांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर १९६६ साली नारळीकर यांचा विवाह मंगला सदाशिराव राजवाडे यांच्याशी झाला. डॉ. मंगला नारळीकर यादेखील गणित तज्ञ आहेत. १९६६ ते १९७२पर्यंत ते या संस्थेशी निगडीत होते. सर हॉईल आणि डॉ. नारळीकर यांनी खगोलशास्त्रात एकत्र संशोधन केले.. गुरुत्वाकर्षणावर त्या दोघांनी मिळून संशोधन करून जो सिद्धांत मांडला, तो हॉईल-नारळीकर सिद्धांत' या नावाने खगोलशास्त्रात प्रसिद्ध आहे. अर्ल्बर्ट आईन्स्टाईनच्या साक्षेपतेच्या सिद्धांताशी साधर्म्य साधणारा असा हा सिद्धांत आहे. हा सिद्धांत असे सांगतो की, वस्तूमधील कणाचे अंतर्गत वस्तुमान हे त्या वस्तूतील सर्व कणांच्या एकत्रित कार्याची परिणती असते. आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव मिळवल्यानंतर भारतातील खगोलशास्त्रातील संशोधनाला आणि लोकप्रियतेला गती देण्यासाठी १९७२ साली ते भारतात परत आले. त्यांनी मुंबई येथील टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून पद स्वीकारले. कालांतराने १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्त झाली. त्यांच्या महान कार्याची दखल अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांनी घेतली. त्यामुळे त्यांना अनेक मान-सन्मान प्राप्त झाले. १९६५ साली त्यांना पद्मभूषण तर २००४ साली पद्मविभूषणने सन्मानीत करण्यात आले. शिवाय डॉ. भटनागर स्मृती पारितोषिक, एम.पी. बिरला सन्मान आणि फ्रेंच ऍस्ट्रॉलॉजिकल सोसायटीचा पिक्स ज्यूल्स जेन्सनसारखे सन्मानही त्यांना प्राप्त झाले. लंडनच्या रॉयल ऍस्ट्रॉनॉमिकल सोसायटीचे ते सहाधिकारी आहेत, तर इंडियन नॅशनल सायन्स अकॅडमी आणि थर्ड वर्ल्ड अकॅडमी ऑफ सायन्सेस चे ते अधिछात्र आहेत. इंडियन नॅशनल सायन्स अकॅडमीच्या इंदिरा गांधी पारितोषिकानेही त्यांना सन्मानीत करण्यात आले आहे. वैज्ञानिक विषयांत साहित्यिक लिखाण करून विज्ञानाचा प्रसार करण्यासाठीही त्यांना १९९६ साली युनेस्कोने कलिंग पारितोषिक देऊन त्यांचा सन्मान केला आहे.



**डॉ. जयंत नारळीकर हे वैज्ञानिक तर आहेतच; परंतु, मराठी साहित्यात त्यांनी मोलाची भर टाकली आहे. त्याची जेव्हा पहिली 'प्रेषित' नावाची कादंबरी प्रसिद्ध झाले तेव्हा ती वाचताना मला काही गोष्टीची माहिती करून घ्यायची होती तेव्हा माझा डॉ. जयंत नारळीकर यांच्याशी पत्रव्यवहार झाला होता त्यातील त्याच्या हस्ताक्षरातील दोन पत्रे आजही माझ्याकडे आहेत.**

डॉक्टर जयंत नारळीकर यांनी अ कॉस्मिक ऍडव्हेन्चर, सेव्हन वंडर्स ऑफ कॉसमॉस, अंतराळातील भस्मासुर, गणित आणि विज्ञान युगयागांची जुगलबंदी, प्रेषित, व्हायरस, यक्षांची देणगी, अंतराळ आणि विज्ञान, आकाशाशी जडले नाते, अंतराळातील स्फोट, नभात हसरे तारे, विज्ञानाची गरुडझेप, वामन परत न आला, कृष्णमेघ (अनुवाद) विज्ञानगंगेची अवखळ वळणे, अभयारण्य, सृष्टीविज्ञान गाथाची अनेक पुस्तके, टाईम मशीनची किमया अशी अनेक पुस्तके लिहून साहित्यात मोलाची भर टाकली आहे. डॉ. जयंत नारळीकर यांचे 'चार नगरांतले माझे विश्व' हे आत्मचरित्रही प्रकाशित झालेले आहे.

***सतीश चाफेकर,***
लोकमत

---

कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंगना पत्रकार परिषदेत बोलण्यासाठी निवडणे, देशविदेशात माध्यमांच्या समोर, इतर राष्ट्रप्रमुख असताना गांधींच्या पुतळ्याला गुडघे टेकून नमस्कार करणे, महिलांचा दुर्गा, देवी म्हणून उदोउदो करुन मखरात बसवणे, बेटी पढाव बेटी बचाव अभियान चालवणे, उठता बसता संविधानाच्या नावाने टाळ वाजवणे, शिवाजीमहाराज, संभाजी महाराजांना धार्मिक राजकारणासाठी वापरणे, हा मुखवटा आहे....

कर्नल सोफिया कुरेशींचा धर्म काढून त्यांना शिवराळ भाषेत बोलणे, विक्रम मिसरीच्या मुलींवर अश्लील टिप्पणी करणे, विरोधातल्या स्त्री पुरुषांना अतिशय गलिच्छ भाषेत ट्रोल करणे, नथुरामच उदात्तीकरण करुन गांधीना शिव्या घालणे, सामुहिक बलात्काराच्या आरोपींचा सत्कार करणे, महिलांचे शोषण करणाऱ्या लोकांना संरक्षण देणे, स्त्रियांना चूल आणि मूल यामध्ये जखडून ठेवणारी धोरण आणि कृती करणे, सगळे संसदीय संकेत, नैतिकता, कायदे धाब्यावर बसवून पक्ष, नेते धाक दाखवून पळवणे, फोडणे, राज्यपाल, विधानसभा अध्यक्षांनी पक्षपाती वागणे शिवाजी महाराजांचा अपमान करणाऱ्या लोकांना संरक्षण देणे, हा खरा चेहरा आहे....

मुखवटा जगाला दाखवायला आहे...भेसूर चेहरा आपल्या समोर आहे...

*...आनंद शितोळे*



# मुंबईकर कोकणी चाकरमानी

साधारण पस्तीस चाळीस वर्षापूर्वीचे खरे वास्तव. कोकणातील बहुतांश लोक नोकरी किंवा काम धंद्याच्या निमित्ताने मुंबई आणि उपनगरात रहायचे. महाराष्ट्रातील इतर ठिकाणी म्हणजेच पूणे, कोल्हापूर, सांगली, मिरज, नागपूर, नाशिक या ठिकाणी आणि इतर राज्यात सुध्दा काही प्रमाणात कोकणी माणूस रहायचा. परंतु मुंबईपेक्षा तु-लनेने खूपच कमी.

त्यावेळी मुंबईत कामधंदा करणारा कोकणातील माणूस वर्षातून बहुतेक एकदाच गावी यायचा. कारण कोकणात येण्या जाण्यासाठी त्यावेळी आताच्या सारखी वाहतूक व्यवस्था नव्हती. त्यावेळी फक्त एसटीची लालपरी किंवा खाजगी बस हेच प्रवासाचे दोन पर्याय होते. गावच्या घरी काही अप्रिय घटना घडलीच तर, मनात असूनही मुंबईहून ताबडतोब गावी जाणे कोणालाही शक्य नसायचे. कारण त्याकाळी बस सोडली तर, वाहतुकीचे इतर कोणतेही सोईस्कर साधन नव्हते. शिवाय अशा बातम्या मुंबईमधील चाकरमान्यांना कळविण्यासाठी संपर्क व्यवस्था सुद्धा आतासारखी अद्ययावत नव्हती. गावच्या एखाद्या जवळच्या पोस्टात जाऊन तार करायची किंवा तिथेच ट्रंककॉलचा नंबर लागण्यासाठी तासनतांस वाट पहात बसायला लागायचे. तार केलीच तरी ती मुंबईच्या मुख्य कार्यालयात जाऊन त्यानंतर ती प्रत्यक्ष योग्य माणसाला वेळेवर मिळणे म्हणजे दुरापास्तच. याविषयी वेळेचे तर गणितच नव्हते. समजा तार लवकर मिळालीच तर माणूस ताबडतोब गावी येणार तरी कसा? यायला फक्त एसटीची गाडी किंवा खाजगी बस हे दोनच पर्याय. तिथेही पुन्हा वेळेचे बंधन आलेच. एसटी स्टँडवर गेल्यावर ठराविक एका ठिकाणी जायला लगेचच बस मिळेल याची शाश्वती नाही. पुन्हा वेळेचा अपव्यय. त्यामुळे सर्व अंतिम सोपस्कार गावच्या माणसांच्या उपस्थितीत उरकून घेतले जायचे. त्यासाठी मुंबईहून येणाऱ्या माणसाची वाट पाहिली जात नव्हती. परंतु आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. कोकणरत्न स्वर्गीय प्रा. मधू दंडवते केंद्रात रेल्वे मंत्री झाल्यावर त्यांच्या कारकिर्दीत कोंकण रेल्वेचे खूप वर्षांपासूनचे असलेले स्वप्न साकार झाले आणि कोंकण रेल्वेचा शुभारंभ होऊन ती सुरू झाली. आता मनात आले तर वर्षातून दोन-तीन किंवा विशिष्ट परिस्थिती मधे चार वेळा सुध्दा कोणीही मुंबईचा चाकरमानी मुलगा, मुलगी आईवडिलांना किंवा जवळच्या नातेवाईकांना गावी येऊन भेटून जाऊ शकतात...

परंतु पूर्वीच्या काळातील ती भावनिक भेट, गावाहून मुंबईला परत निघताना निरोपाचा तो भावनिक क्षण आज कुठे तरी नक्की हरवलाय. आपण सर्वजण सध्याच्या यांत्रिक युगात एकमेकांच्या खूपच जवळ आलोय, पण आपल्या भावना मात्र कुठेतरी नक्कीच लुप्त झाल्यायत. त्यावेळी मुंबईला परत निघताना मुलाला दिली जाणारी गावच्या वस्तूंची ती अमूल्य भेट म्हणजे प्रेमाचं एक प्रतीकच असायचं. त्यासाठी आईची किती धावपळ व्हायची. माझ्या बाळाला हे देऊ की ते देऊ. काय काय देऊ या विचारातच तिचा दिवस संपून जायचा. मुलगा दहा बारा दिवसांसाठीच घरी आलेला असायचा. त्यातील दोन दिवस तर गावातील इतर लोकांना भेटण्यातच जायचे. उरलेल्या दिवसात लेकराला काय खायला घालू आणि काय नको यातच बिचारी माऊली हरखून जायची. तांदळाच्या पीठाचे घावने आणि त्याबरोबर ओल्या नारळाच्या खोबऱ्याचे दूध, कोंबडी वडे, गावच्या नदीचे गोड मासे, पुरणपोळ्या, उकडीचे मोदक की, अजून काही तरी. मुंबईला परतताना गावठी तांदूळ, आमसुलं, चिंच, कुळीथाचे पीठ, डांगराचे पीठ, उब्जाचे पीठ, आंबा - फणसाची साठं, (आंबा पोळी आणि फणस पोळी) तळलेले गरे, गावठी मसाले असे लहान सहान पदार्थांचे गाठोडे बांधले जायचे. बाजूच्या इतर लोकांना समजले की ते सुद्धा आपापल्या नातेवाईकांना भेट देण्यासाठी काही तरी घेऊन यायचे. कुणी चिठ्ठी तर कुणी फडक्यात बांधून तांदूळ, वेगवेगळी पीठं वगैरे आणायचे. त्यात एक वेगळाच ओलावा जाणवायचा...

मुलगा गावी येताना बरोबर मुंबईहून खूप काही सामान घेऊन यायचा. त्यामध्ये मग सुके बोंबील, सुकी मच्छी, वेगवेगळ्या प्रकारचे मसाले, तिखट, लाल मिरची आणि अगदी बटाटे सुध्दा असायचे. सर्वांसाठी कपडे, सुका मेवा, बच्चे कंपनीसाठी वेगवेगळ्या प्रकारचा खाऊ वगैरे हमखास असायचाच. घरी पोहोचल्यावर सामानाच्या बॅगा उघडेपर्यंत कोणालाही धीर नसायचा. सर्वांसाठी काय काय आणलंय हे पहाण्यासाठी सर्वांचीच घाई. कपडे, लाडू, लालबागचा प्रसिद्ध चिवडा किंवा इतर कोणकोणते खाऊचे पदार्थ आणलेत त्याची सर्व चाचपणी व्हायची. सर्व काही पाहिल्याशिवाय चैन पडायची नाही. मग घरी येणाऱ्या प्रत्येकाला थोडा थोडा खाऊ दिला जायचा. 'माझा मुलगा आलाय, मुंबयहून' असं बोलताना माऊलीला भरुन यायचं. सतत आपल्या प्रेमाच्या छायेत वाढलेलं आपलं लेकरू पुन्हा समोर दिसल्यावर जो काही आनंद व्हायचा तो क्षण फक्त ती जन्मदात्री आईच जाणो...

मुंबईला परत निघताना मग ती सर्वांची रडारड. हे पाहून मुलाचे तिथून पाय निघता निघायचे नाहीत. 'पोरा, अजून चार पाच दिवस राहिला असतास तर नसतं जमलं का रे' हे आईचं नेहमीचं वाक्य. 'मुलगा कितीही दिवस राहिला तरी माऊलीला ते नेहमी कमीच वाटायचं. कितीही करुन खायला घातले तरी अजून हे नाही करता आलं, हे माऊलीचे नेहमीचे वाक्य ऐकायला मिळायचे. मुंबईला निघताना एक लक्षवेधी क्षण म्हणजे मुलाच्या हातावर दही देताना माऊलीचा थरथरणारा हात आणि तिच्या डोळ्यातून वहाणाऱ्या अखंड अश्रुधारा. उंबरठ्या बाहेर अंगणात आल्यावर आईचा हात नेहमी पाठीवरुन फिरायचा. 'काम धंदा नीट सांभाळून कर रे बाबा, स्वतःच्या तब्येतीची काळजी घे' आणि 'पोहोचल्यावर न चुकता पत्र पाठव, अधून मधून खुशाली कळवित जा रे बाबा. हे बोलले की झाली अखेर निरोपाची वेळ...

शेवटी प्रत्येकाच्या हातावर काही तरी निरोपाची चिरीमिरी ठेवायची ही तर त्यावेळी रीतच होती. मग ते वीस - पंचवीस रुपये असोत की पन्नास. त्या काळात ते सुद्धा खूप वाटायचे. त्यातून चेहऱ्यावर दिसणारे सात्विक समाधान हे वेगळेच असायचे. या सोहोळ्यातून बच्चे मंडळी पण सुटायची नाहीत. त्यांच्या हातावर पण दोन - पाच रुपये ठेवले की ती सुद्धा खूष. त्यात सुध्दा त्या नवीन कोऱ्या नोटा असतील तर मग बघायलाच नको त्यांच्या चेहऱ्यावरचा तो परमानंद.

मुलाने मागे पाहून वर उंचावलेला तो निरोपाचा हात आणि..........आई, सांभाळ स्वतःला आणि इतरांना' असे सांगताना तो पुन्हा परत येईस्तोवर त्या आठवणीतच पुढे जगायचं ते सारे कुटुंब. त्याचे पोहोचल्याचे पत्र येईपर्यंत मग रोज अंगणात येऊन पोस्टमनची वाट पहायची आणि आमचे पत्र आहे का रे म्हणून त्याला रोज विचारायचे पत्र येईपर्यंत.

...पृष्ठ क्र. ११ वर



# आर्थिक बहिष्काराचं, धार्मिक राजकारण !

**अजरबैजान, तुर्की आणि मलेशिया या देशांवर बहिष्कार टाकावा अशी जोरदार मोहीम सुरू आहे कारण त्यांनी पाकिस्तानला उघड पाठिंबा दिला.**

**देशभक्ती जागलीच असेल तुमच्या मनात, फार जास्त उचंबळून आली असेल तर असा अर्धवट बहिष्कार कृपया टाकू नका.**

आपली अजरबैजान, तुर्की, मलेशियाची केलेली/न केलेली बुकिंग्ज कॅन्सल करून दुसरीकडे कुठे जाण्याचा विचार करत असाल तर त्याआधी आपल्या बहिष्कृत देशांच्या लिस्टमध्ये खालील देश ॲड करा!

आयएमएफमधील २४ देशांनी पाकिस्तानला २.५ अब्ज डॉलर्सचे कर्ज देण्यास पाठिंबा दिला.

त्यात–
अमेरिका
चीन
नेदरलँड्स
जपान
युके
जर्मनी
फ्रान्स
इटली
दक्षिण कोरिया
युएई
रशिया
अर्जेंटिना
कॅनडा
यांचा समावेश आहे.

या देशांवरही बहिष्कार का टाकू नये?

जेडी व्हान्स आणि ट्रम्प यांनी उघडपणे पाकिस्तानला पाठिंबा दिला. एफ१६ हे एक अमेरिकन लढाऊ विमान आहे आणि अमेरिकेने ते पाकिस्तानला पुरवले. आपल्यालाही अमेरिकेवर बहिष्कार टाकण्याची गरज नाही का?

असं असेल तर देशातच फिरा, त्यातही पुन्हा काश्मीरवर बहिष्कार आहेच, म्हणजे ते गेलं!

बहिष्कार करायचाय तर करा पण सोबत सरकारला योग्य प्रश्न विचारा.

या सर्व देशांनी पाकिस्तानला पाठिंबा का दिला व आपण कुठे मागे पडलो याचा विचार होणार आहे का?

आता यातील पहिले तीन देश म्हणजे अजरबैजान, तुर्की व मलेशिया यांनी दिलेला पाठिंबा हा केवळ religious basis वर आहे. या देशांमध्ये धार्मिक कट्टरता आधीपासूनच आहे. पण भारताप्रती ही कट्टरता अधीक तीव्र होण्यास भारत स्वतः कारणीभूत आहे, हे नाकारल्यास आपण आपलीच फसवणूक करतोय असं होईल.

**गेली १०–११ वर्षे देशात मुस्लिमविरोधी वातावरण जोपासलं व पोसलं जातंय. कधी गौतस्करीचा संशय तर कधी फ्रिजमध्ये बिफ असल्याचा संशय तर कधी हिंदू मुलींना बहकवण्याचा संशय अशा कित्येक बहाण्यांनी मुस्लिमांना मारणे, जीवे मारणे सुरू आहे देशात. सुरूवातीचा काही काळ काही संघटना ही कृत्य करत होती; पण, हळूहळू हे काम सरकारांनी हाती घेतलं. फक्त बदल एवढाच की, आता मुस्लिमांवर बुलडोझर चालू लागले. लोक बुलडोझर 'न्याय' जल्लोषात सेलिब्रेट करतात. पुढे जाऊन मग या मशिदीखाली हे मंदिर शोध, त्या मशिदीखाली दुसरं हे अगदी कोर्टांच्या मदतीने सुरू झालं.**

भाजप नेता आये दिन मुस्लिमविरोधी विधानं करतात, बिदुरी संसदेत कटूवे, उग्रवादी आणि काय काय बोलला. अनुराग ठाकूर म्हणतो गोली मारो सालोंको. कालच तो मध्य प्रदेशमधील कुणी शाह कर्नल सोफिया कुरैशींना दहशतवाद्यांची बहीण म्हणाला.

नेत्यांचंच काय स्वतः मोदी काय काय बोललेत मुस्लिमांबद्दल अगदी मागचं स्मशान–कब्रस्तान असो, की मग कपडों से पहचान लेता हूँ ते ज्यादा बच्चे पैदा करनेवाले, मंगलसूत्र छिन लेंगे आणि लेटेस्ट म्हणजे पंक्चर बनानेवाले.

आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार अशी म्हण आहे; पण, इथे ती उलटी लागू पडते. इथे मोदीरूपी आडच इतका भरलेला आहे तर त्यांचे चट्टेबट्टे पोहरे ओथंबून वाहणार नाहीत तर काय होणार मुसलमान द्वेषाने.

हे सगळं देशात होत असताना मांजराने डोळे मिटून दूध पिण्यासारखं करुन काय उपयोग आहे...सगळं जग हे बघतंय. जगात हा संदेश कधीच पसरलाय की भारत हा मुस्लिम विरोधी देश आहे. भारतात मुसलमानांवर अत्याचार केले जातात. त्यांच्यावर विनाकारण आर्थिक बहिष्कार टाकला जातो. उगाच नाही ती बिंदी बाई आपली नसलेली अक्कल चमकवततिच्या विखारी प्रचाराला लोकमान्यता मिळते.

पाकिस्तानला डोळे झाकून पाठिंबा देण्यासाठी ही कारणं चिक्कार आहेत या देशांना, भारताने हे आम्ही करत नाही म्हणावं किंवा हिंमत असेल तर थांबवावं. परवाच्या भाषणात मोदींनी चुटक्या वाजवत–बोटं नाचवत पाकिस्तानला जे सांगितलं ते त्यांनी एकदा प्रामाणिकपणे स्वतःला व नंतर देशाला, गोदी मीडियाला सांगावं. त्यांनी सांगावं की, आपण जसे या देशाचे नागरिक आहोत तसेच मुसलमानही बरोबरीचे नागरिक आहेत. तेही आपले देशबांधव आहेत. त्यांच्यावर कुणी कसल्याही प्रकारच्या बहिष्काराची भाषा करणार नाही, त्यांची घरं–दुकानं विनाकारण बुलडोझ केली जाणार नाहीत. वेगवेगळ्या जिहादांखाली त्यांना गुन्हेगार ठरवलं जाणार नाही. हे करावं व मग इतर देशांवर बहिष्कार घालत फिरावं!

**चूक पाकिस्तानची होती पण ट्रम्पने बोलताना एकदातरी तसा उल्लेख केला का? उलटं त्याने भारताला पाकिस्तान सोबत नेऊन बसवलं, जे याआधी कधीच झालं नव्हतं.**

**का ट्रम्प म्हणतो की तो काश्मीरमुद्दावर मध्यस्थी करणार आहे का यावर मोदी स्पष्टपणे बोलत नाहीत. काश्मीर या आपल्या अंतर्गत मुद्द्यावर का तिसरा देश बोलतो?**

पाकिस्तान दहशतवादाचं समर्थन करतो, त्यांना संरक्षण देतो हे काही जुनं नाही, हे जग जाणतो पण तरीही अशा पाकिस्तानला उघड वा आडून हे सगळे देश पाठिंबा देतात यामध्ये पाकिस्तानचं काही कतृत्व असावं असं वाटतं का? तर नाही.

मग आपल्या देशाची diplomacy सपशेल फसलीये हे कळू नये का? जयशंकर विदेश मंत्री म्हणून काय खोटे लेजर डोळे दाखवण्यापुरता आहे का?

आज आपल्या आजूबाजूच्या एकही देश आपला मित्र आहे हे म्हणण्याची सोय राहिली नाही.

राहुल गांधी म्हटले तसं, चीन–पाकिस्तानला एकत्र आणण्याचे 'पाप' या सरकारने केलंय....

या सगळ्या गोष्टींवर सरकारला, पंतप्रधानांना, विदेशमंत्र्यांना जाब विचारायचा सोडून हे काय करणार तर देशांवर, लोकांवर बहिष्कार घालणार!

***– मोनिका***

---

## मुंबईकर कोकणी चाकरमानी ...पृष्ठ क्र. १० वरुन

पत्र आठ दहा दिवसांनी यायचं, 'मी सुखरूप पोहोचलो, काळजी नसावी'........अशी माया, प्रेम, वात्सल्य आणि आपुलकी आपल्या माणसांवर असणारी बा.भ. बोरकरांनी त्यांच्या कवितेत वर्णन केलेली साधी भोळी आणि प्रत्येकाच्या काळजात शहाळी भरलेली अशी ही कोकणची माणसं...

आता मात्र पूर्वीची परिस्थिती राहिली नाही. केव्हाही आठवण आली की लगेचच मोबाईल फोन उचलून 'व्हिडिओ कॉल... महत्त्वाचे काहीतरी सांगायचे असेल तर वॉट्सअप मेसेज आहेच. त्यात आनंदाची बातमी म्हणजे कोकणात विमान सेवाही चालू झाली आहे. रेल्वे आणि विमान सेवा यामुळे जग तर अजूनही जवळ आले. मुंबईहून दरमहा येणाऱ्या मनीऑर्डरची वाट बघणेही आता बंद झाले. पूर्वी पोस्टमन नाव घेऊन हाका मारायचा 'तुमची मनीऑर्डर' आलेय. बाहेर या. मग केवढा तो मानसिक आनंद व्हायचा. आज मात्र हे सर्व काही इतिहास जमा झाले. आजच्या ऑनलाईन 'मनी ट्रान्सफर' च्या युगात लगेचच थेट अकाऊंटवर पैसे जमा व्हायला लागले. खाण्यापासून इतर सर्व प्रकारच्या वस्तू आता सर्वत्र कुठेही मिळतात. त्यामुळे त्यात पूर्वीचे अप्रूप राहिले नाही. पण एका गोष्टीपासून मात्र, आपण खूपच दुरावलोय. पूर्वी असलेले भावनांचे अतूट बंध आणि त्या प्रती असलेला प्रेम व्यक्त करण्याचा तो क्षण आज कुठेतरी हरवलाय. कुटुंबातील सर्व जण जरी खूप दिवसांनी एकमेकांना भेटले तरी एकमेकांप्रती असलेला प्रेमाचा एक सुंदर झरा मात्र आज कुठेतरी हरवलाय. आता ते दिवस पुन्हा येणार नाहीत....अन् पुढची पिढी मात्र या सर्व गोष्टींविषयी अनभिज्ञच रहाणार हे नक्की.

# पार्टनर

व.पु.काळेंचं साहित्य माझ्यासाठी नेहमीच खास नि स्पेशल राहिलं आहे. त्यांच्या लेखनात एक वेगळाच जिव्हाळा नि जीवनाकडे पाहण्याची एक समजूतदार दृष्टी असते. मी आधी वाचलेली त्यांची अनेक पुस्तकं वपुर्झा, तू भ्रमत आहासी वाया, आपण सारे अर्जुन, दोस्त, पाणपोई, तप्तपदी इत्यादी. प्रत्येक वेळी मला वेगळ्या कोनातून विचार करायला लावतात. त्यातलंच एक खास पुस्तक म्हणजे ''पार्टनर.'' या कादंबरीने मला केवळ कहाणी नाही दिली, तर एक खोल भावनिक नि मानसिक प्रवास दिला.

**मी ही कादंबरी आधी एकदा वाचली होती. तेव्हा ती एक प्रेमकथा वाटली होती. श्री, किरण, अरविंद यांची गोष्ट. पण आता, मागे पुन्हा एकदा प्रेमात पडल्यावर पुन्हा जेव्हा वाचली, तेव्हा तिचं वेगळंच रूप उघडं पडलं. वपु कधीच सरळ कथा सांगत नाहीत. ते पात्रांमधून, प्रसंगांमधून नि खूप साध्या शब्दांतून मोठ्या प्रश्नांची उत्तरं देतात.**

या कादंबरीतलं सर्वात विशेष पात्र म्हणजे ''पार्टनर.'' त्याचं नाव कधी येत नाही, पण त्याचं अस्तित्व पूर्ण कथेत जाणवत राहतं. तो श्रीच्या आयुष्यात येतो, त्याला ऐकतो, समजतो नि मग हळूच निघूनही जातो. पण श्रीला त्याचा खरा अर्थ कळायला वेळ लागतो नि आपल्यालाही. मला स्वतः ला असं वाटतं की हा 'पार्टनर' म्हणजे वपु स्वतःच आहेत. ते आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात असेच येतात त्यांच्या पुस्तकांच्या माध्यमातून आपल्याला थांबायला, विचार करायला नि स्वतःला समजून घ्यायला लावतात.

**''पार्टनर'' वाचताना मला अनेकदा थांबावं लागलं, काही वाक्यं पुन्हा पुन्हा वाचावी लागली. कारण ते फक्त शब्द नव्हते, तर आरसे होते. उदाहरणार्थ, ''गणिताच्या उत्तरासारखी तुम्ही आयुष्याकडे अपेक्षा करता नि जास्त दुःखी होता.'' हे वाक्य थेट मनात घुसतं. आपल्याला वाटतं की प्रत्येक नातं, प्रत्येक प्रसंग परिपूर्ण असावा, पण तसं होत नाही. आणि ही असमजूत दुःखाचं मूळ ठरते.**

**ही कादंबरी म्हणजे एक प्रकारची मानसशास्त्रीय थेरपी आहे. यातली माणसं परिपूर्ण नाहीत. श्रीचा राग, त्याचा गर्व, किरणचं समजून न घेणं, अरविंदचं नक्की काय करायचं याबद्दलचं गोंधळ ही सगळी पात्रं खूप खरी वाटतात. आपल्या आजूबाजूच्या, किंवा अगदी आपल्या आयुष्यातल्या माणसांसारखी.**

या सगळ्या प्रवासात 'पार्टनर' श्रीला नि मुळात आपल्याला एक मोठा शिकवण देऊन जातात की, आयुष्य कोणत्याही एक नात्यावर आधारलेलं नसतं. आपण ज्या माणसांना ''सर्वकाही'' मानतो, तेच जर आपल्याला समजून घेत नाहीत, तर त्यांना धरून बसण्यात अर्थ नसतो. या कथेच्या शेवटी, श्री स्वतःकडे वळतो नि मला वाटतं, हीच वपुंची जादू आहे ते आपल्या वाचकाला शेवटी त्याच्याच मनात सोडतात, विचार करायला भाग पाडतात.

ही कादंबरी वाचल्यावर मला खूप छान वाटलं. कारण ही कादंबरी मनाच्या खूप खोलपर्यंत जाते. प्रत्येकाला आपला एक 'पार्टनर' आयुष्यात असतो जो दिसत नाही, पण




आपल्याला समजून घेतो. वपुंच्या या पुस्तकाने मला असाच एक मनाचा मित्र दिला.

**बाकी शेवटी**

याबद्दल लिहायला, बोलायला खूप काही आहे. पण माझ्यामते तुम्ही हे सगळं स्वतः अनुभवायला हवं. या साध्या शब्दांतून आकार घेत गेलेली १५० पानांची ही अंतर्मुख करणारी वाटचाल.

**त्यामुळे ही कादंबरी जरूर वाचा. ती तुमचं काहीतरी हरवलेलं शोधायला मदत करेल.शोधा तुमचा पार्टनर तो व्यक्ती जो ऐकेल, समजून घेईल, तुमच्याशी न बोलता संवाद साधेल नि जरी असा पार्टनर मिळाला नाही, तरीही हरकत नाही –तुम्ही मात्र नक्कीच कोणाच्या तरी जीवनात असा पार्टनर होऊ शकता.**

**मन:पूर्वक शुभेच्छा सर्वांना...**

शेवटी नेहमीप्रमाणे यातील मला आवडलेले विचार म्हणा किंवा काही तत्वज्ञान :–

- ज्या माणसाच्या बाबतीत प्रेमाची वाटचाल लग्नाच्या मंडपात संपते तो वाया गेला.
- माणूस गर्दीचा झाला म्हणजे हरवत नाही, एकटा राह्यला की हरवतो.
- आमचा देव दगडाचा नाही, आम्ही दगडात देव पाहणारी माणसं आहोत,
- शरीराच्या एका गरजे पुरतीच बाईला पुरुष आणि पुरुषाला बाई हवी असते, बाकी निसर्गाच्या गरजा प्रत्येकाच्या एकेकट्या च्या असतात,
- माणसाची नजर ज्या वस्तूकडे असते, तीच वस्तू त्याला पहायची आह, तसं त्या माणसाकडे पाहणाऱ्या इतरांना वाटतं.
- सौंदर्याची ओढ वाटणं ही जिवंतपणाची खून असते.
- स्वतःच नाव विसरणं ह्यात मस्त आनंद आहे, खरं तर आपल्याला नावच नसतं, बारशाला नाव ठेवतात ते देहाचं.
- डोळे आणि स्पर्श, शब्दांपेक्षा छान बोलतात.
- दोन इंच लांबीच्या जिभेवर पदार्थ असतो, तोवर 'चव', खाली उतरला की 'घास', सुगंधाचं नातं नाकाशी, घशातून आत गेल्यावर ती फक्त 'हवा', खरंतर सगळ्या पंचेंद्रियाच नातं रसिकतेशी नसून तृप्तिशी असतं, तो क्षण संपला की रसिकता संपली, इतर अनेक गरजांपैकी 'तृप्ती' ही गरज आहे, जो गरजू आह, त्याला व्यवहार सांभाळावा लागतो, व्यवहार नेहमीच साधतो असा नाही, तो सत्यासारखा कटू असतो, ज्या मनात रसिकता असते त्याच मनात कटुता असते,
- गणिताच्या उत्तरासारखी तुम्ही आयुष्याकडे अपेक्षा करता आणि जास्त दुःखी होता, आयुष्य काही गणिताचं कोड नाही लगेच सुटायला,
- जो मागं राहणार आहे, त्याचंच खरं मरण आहे, मरणारी व्यक्ती सुटून जाणार आहे, ज्याला आघात सहन करायला मागे राहायचं आहे, त्याचं खरं मरण आहे.
- नजर शाबूत असलेला बाप मुलाला एकदाच जन्म देऊन थांबत नाही, आयुष्यभर तो जन्मच देत असतो,

...Bookish Moin

हे पुस्तक कोठे मिळेल :– हे पुस्तक घरपोच मिळवण्यासाठी थश ठशरव ला संपर्क करू शकता.

https://wa.me/7066495828 या लिंकवर जावून पुस्तकाचं नाव नि आपला पत्ता पाठवा...

नीतितत्त्वांना हरताळ फासून निर्मिलेल्या, अनेक भांडवली–थोतांडांपैकी एक थोतांड म्हणजे, भांडवलदारांना कॉर्पोरेटीय–उत्तरदायित्व 'मर्यादित' (Limited Liability) हवं असतं; पण, मिळणारे नफे मात्र, अमर्यादित (Unlimited Benefits) हवे असतात...त्यांना अडचणीच्या काळात सरकारी–मदत (Pakages) हवी असते... पण, एरव्ही व्यवहारात 'सरकारी–नियंत्रणे' अजिबात नको असतात. संपत्ती–निर्मितीत, ते एकदम प्रवीण असतात; पण, संपत्तीचं यथायोग्य वाटप किंवा वितरण करायचं म्हटलं की, ते त्याबाबतीत एकदम 'अनभिज्ञ' असल्यासारखे वागतात...कॉर्पोरेटीय नफे, त्यांच्या हक्काचे असतात आणि तोटे मात्र, कामगार–कर्मचारीवर्गाच्या माथी मारायला ते मोकळे असतात; म्हणजेच, "Profits are Private and Losses are Public", हीच बदमाषीपूर्ण भांडवली–धारणा असते!

अमेरिकेतील 'साखर–उद्योग' अमेरिकन जनतेच्या जीवाशी बेमुर्वतखोरपणे खेळ खेळत राहीला... साखरसम्राट व ऊस मळेवाल्यांनी, साखरेमुळे हृदयविकार बळावतो, हे शास्त्रज्ञांनी सिद्ध केल्यावर प्रचंड पैसा पेरुन व मेकून, त्याची गाडी 'कोलेस्टेरॉल'च्या रुळावर जबरदस्तीने वळवली व दीर्घकाळ अमेरिकन समाजासह जगभरातील लोकं, हृदयविकार व कर्करोगकारक असलेली साखर निर्धास्तपणे खात, आपल्या तब्येती जाणिवपूर्वक पसरवलेल्या अज्ञानापोटी पिढ्यानपिढ्या बिघडवत राहीले, मृत्युला मोठ्याप्रमाणावर आमंत्रण देत राहीले. ज्या कोलेस्टेरॉलचा हृदयविकाराशी अर्थाअर्थी फारसा संबंध नव्हता; त्याबद्दल मात्र, या 'भांडवली' नफेखोरी–फसवेगिरीमुळे, निष्कारण अतोनात काळजी घेत राहिले...परिणामतः, अमेरिकन साखर–उद्योग, निरंकुश बेफाम वाढत राहीला, तो आजतागायत!

# मध्यममवर्ग



**प्लेटो न लोकशाही बद्दल म्हटले होते की, लोकशाहीमध्ये गोंधळ निर्माण होऊ शकतो कारण लोकांना स्थिरता देणारा मजबूत नेता हवा असतो. परंतु हा नेता लोकशाही मूल्ये जपण्याऐवजी हुकूमशहा बनू शकतो. सामाजिक आणि आर्थिक स्तरावर घसरण्याच्या चिंतेत असलेला मध्यमवर्ग या बदलाचा मुख्य आधार बनतो. ते आपले भविष्य सुरक्षित करत असल्याचा विश्वास ठेवून ताकदवान भासणाऱ्या अशा नेत्यांचे स्वागत करतात, परंतु प्रत्यक्षात ते स्वतःला संरक्षण देणाऱ्या संस्थांचा नाश करत असतात. लोकशाही ही सिद्धांततः लोकांची सत्ता असते. प्रत्यक्षात मात्र, ती अनेकदा मध्यमवर्गासारख्या असुरक्षित घटकांकडून हायजॅक केली जाते. श्रीमंतवर्गाकडे आधीच सत्ता असते, तर गरीब वर्ग उदरनिर्वाहाच्या चिंतेत असतो. याउलट, मध्यमवर्ग सतत एका तारणहाराच्या शोधात असतो. ते राजकीय विचारसरणीमध्ये झुलत राहतात आणि अल्पकालीन सुरक्षेचे आश्वासन देणाऱ्या नेत्याला मत देतात, ज्यामुळे दीर्घकालीन लोकशाही मूल्यांना धक्का बसतो. आर्थिक अस्थिरतेची भीती, सामाजिक महत्त्वाकांक्षा आणि नियंत्रणाची इच्छा यामुळे मध्यमवर्ग हा स्वातंत्र्याच्या बदल्यात सुव्यवस्था देणाऱ्या हुकूमशाहीचा सोपा बळी ठरतो.**

भारतात सर्वाधिक भ्रमित जर कोणता वर्ग असेल तर, मध्यमवर्ग. जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण झाली आहे. इंधनाच्या किमतीवर अनेक खर्च अवलंबून असतात. भारतात जर इंधनाच्या किमती कमी झाल्या असत्या तर मागावी आटोक्यात येण्याला थोडा वाव होता. भारतातले इंधनाचे भाव कमी होणे दूर, उलट सरकारने पेट्रोल डिझेलवर २ रुपये आणि गॅस सिलिंडर वर ५० रुपये कर वाढवले. परंतु बहुतांश मध्यमवर्गाला वाटत असावं की महिन्याला ५०, १०० रुपये फक्त वाढले. परंतु या वाढीमुळे त्यामुळे जवळपास सर्वच वस्तूंच्या किमती वाढणार हे त्यांच्या लक्षात येत नाही. याच मध्यमवर्गाचे सरासरी कर्ज वाढले आहे आणि उलट बचत कमी झाली आहे, कारण उत्पन्न न वाढता खर्च वाढले. वैयक्तिक कर्ज, क्रेडिट कार्ड वरची थकबाकी, सोन्यावरचे कर्ज वगैरे सर्व प्रकारच्या कर्जात वाढ झाली. क्रेडिट कार्ड हे शक्यतो उच्च मध्यमवर्गीय उत्पन्न गटातील व्यक्तीकडे असते असा अंदाज आहे. क्रेडिट कार्डच्या थकबाकीमध्ये मागच्या वर्षीच्या तुलनेत २८% वाढ झाली आहे. क्रेडिट कार्ड कर्ज जे सर्वात महागडे किंवा धोकादायक समजले जाते ते व इतर रिटेल कर्ज यात १० वर्षात एकूण बँकिंग व्यवस्थेत ४% वरून ११% इतकी वाढ झाली आहे. आकडेवारीनुसार एकूण कर्जदारांपैकी ४५% व्यक्तींचा क्रेडिट स्कोर किंवा कर्ज क्षमता खराब आहे म्हणजे कर्ज बुडण्याची अधिक भीती. अंदाजे ४८% व्यक्तींनी घेतलेले कर्ज हे दैनंदिन गरज भागवण्यासाठीचे आहे उदाहरणार्थ शिक्षणाचा अथवा उपचाराचा खर्च, थकीत बिले अथवा जुनी कर्ज फेडण्यासाठी. मध्यमवर्गीयांपैकी अंदाजे १०% व्यक्ती कर्जाच्या दुष्टचक्रात अडकल्या आहेत. ६७% मध्यमवर्गीयांनी वैयक्तिक कर्ज घेतले आहे, २५% कर्जदारांकडे पर्सनल लोन, क्रेडिट कार्ड आणि किमान अजून एक जास्त व्याजदर असणारे कर्ज आहे. हे आकडे फार धोकादायक आहेत. दरवर्षी लाखो लोकं मध्यमवर्गातून गरीब या श्रेणीत ढकलली जात आहेत. कुटुंबातील एखाद्या गंभीर आजारामुळे मध्यमवर्गीय कुटुंब गरिबीत ढकलले जाऊ शकते अशी आरोग्य व्यवस्था आहे.

भारतात मध्यमवर्ग या संज्ञेबाबत सुस्पष्टता नाही. मध्यमवर्ग म्हणजे नेमका कोणता उत्पन्न गट ? की मध्यमवर्ग म्हणजे श्रीमंत व गरीब यांच्या मधील लोकसंख्या ? ही सुस्पष्टता नसल्यामुळे अनेकजण स्वतःला मध्यमवर्गीय समजतात. आर्थिकदृष्ट्या भारतातील मध्यमवर्गीयांचे सरासरी उत्पन्न वार्षिक ३००० डॉलर्स म्हणजे २.६ लाख इतके असावे म्हणजे महिन्याला २२००० च्या आसपास. नॅशनल हाऊजिंग बँक इंडेक्स नुसार मुंबईमधील घराची सरासरी किंमत जर १ कोटी असेल तर ते विकत घ्यायला या वर्गाला ३८ वर्षांचे एकूण उत्पन्न लागेल, कारची सरासरी किंमत जर १३ लाख असेल तर ५ वर्षांचे एकूण उत्पन्न लागेल, आणि आयफोनची सरासरी किंमत ६०००० असल्यास तीन महिन्यांचे एकूण उत्पन्न लागेल. काही वर्षांपूर्वी दुचाकी असणे (विकत घेणे किंवा परवडणे) हा मध्यमवर्गाचा निकष समजलं जात असे, गेल्या काही वर्षांपासून काही जण कार घेणे किंवा परवडणे हा निकष समजतात. भारतात फक्त ८% व्यक्तींकडे किमान एक कार आहे त्यात टॅक्सी सुद्धा गृहीत धरलेली आहे. मार्सिलस इन्व्हेस्टमेंट च्या सौरभ मुखर्जी यांच्या अभ्यासानुसार, भारतात जे मध्यमवर्गीय समजले जातात त्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न गेल्या १० वर्षात तेवढेच आहे, आणि जर त्यात गेल्या १० वर्षातील महागाई जोडली तर रिअल इन्कम/खरे उत्पन्न अर्धे झाले आहे. या मध्यमवर्गीयांमध्ये देखील अनेकांच्या नोकऱ्या वाढत्या तंत्रज्ञानामुळे गेल्या आहेत, कमी होत आहेत किंवा वाढत नाही आहेत. साधे उदाहरण म्हणजे बँकेत कॅश देणारे जॉब, ऑनलाईन पेमेंट किंवा -TM मुळे कमी झाले (हे फक्त एक उदाहरण) ताज्या आर्थिक सर्वेक्षणानुसार भारतातील कॉर्पोरेटचा नफा १५ वर्षात सर्वाधिक आहे, या नफ्यामागे सरकारची भूमिका, योजना कारणीभूत आहेत हे स्पष्टच आहे. **एक उदाहरण म्हणजे कॉर्पोरेट टॅक्स ३०% वरून २२% करणे, परंतु कर्मचाऱ्यांचा पगार मात्र वाढलेला नाही. नफ्याच्या पटीत कर्मचाऱ्यांची संख्या वाढली नाही आणि कॉर्पोरेटची देशांतर्गत गुंतवणूक घटली आहे. सरकारी कंजम्पशन सर्वेनुसार एका दशकापूर्वी शहरी भागातील व्यक्तीचा खानपान व्यतिरिक्त दुसरा सर्वात मोठा खर्च शिक्षणावर होत असे जो सध्या प्रवासावर होत आहे. याचा अर्थ प्रवास महागला व शिक्षणाकडे दुर्लक्ष होत असावे. २०११/१२ मध्ये भारतीय कुटुंबाची सरासरी बचत त्यांच्या कर्जाच्या ८ पट होती जी आता फक्त ४ पट इतकी आहे. म्हणजे बचत कमी होत आहे आणि खर्च वाढतोय.**

इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनच्या डेटानुसार, भारतातील कर्मचारी सर्वात कमी मोबदला मिळण्याच्या क्रमवारीत जगात 'तळापासून ५व्या' क्रमांकावर आहेत. (क्रयशक्ती समता गृहीत धरूनही), कुशल कामगार अथवा उच्च शिक्षित असल्यास त्यांचा 'तळापासून ७ वा' क्रमांक लागतो. शिवाय इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन, स्वयंरोजगारीत असण्याला (ठेला लावणे, घरच्यांना कामात मदत करणे वगैरे) रोजगार समजत नाही मात्र उलट भारत सरकार त्यांना बेरोजगार मनात नाही. बेरोजगारीबद्दल बोलायचं तर भारतीय रेल्वेच्या ड श्रेणीसाठी ३२४३८ रिक्त पदे होती. ज्यात बेसिक पगार होता १८००० रुपये फक्त. आणि या पदासाठी एकूण अर्ज आले एक कोटी आठ लाख बावीस हजार चारशे तेवीस. २०२४/२५ मध्ये फक्त ३ परदेशी कंपन्यांनी भारतात उत्पादनासाठी ऑपरेशन्स सुरु केले. भारतातील उत्पादनाचा जीडीपी आणि निर्यातीमधील वाटा घसरला आहे. २०२३ मध्ये १५९२१ आणि २०२४ मध्ये १२७१७ असे साधारण २८००० स्टार्टअप्स दोन वर्षात बंद झाले. त्यातल्या अनेकांनी दिवाळखोरी जाहीर केली आहे. म्हणजेच लाखोंच्या नोकऱ्या गेल्या आणि अनेकांना त्यांचा पूर्ण पगारदेखील मिळाला नसावा. शिवाय २०२४ मध्ये फक्त ५२६४ नवीन स्टार्टअप्स सुरु झाले, त्याच्या आधीच्या वर्षी ९६०० हा एकदा होता म्हणजे अंदाजे ४०% घट. नवीन स्टार्टअप येण्या पेक्षा जुने स्टार्टअप बंद होणे जवळपास दुप्पट तिप्पट आहे. स्टार्टअप बंद पडण्याची संख्या २०२० ते २२ च्या तुलनेत १२ पट जास्त आहे. परंतु याच दोन, तीन वर्षात अजून एक बदलेली आकडेवारी आहे. अदानी समूहाचे भारतीय बँक आणि वित्त संस्थेकडून कर्ज घेणे चौपट वाढले आहे. २७००० कोटींवरून १ लाख कोटींच्या वर गेले आहे. मात्र याच बँकांनी कृषी, शिक्षण, बांधकाम वगैरे सारख्या ज्याला प्रायोरिटी सेक्टर म्हणतात तिथे कर्ज देणे मात्र कमी केले आहे. भारतातील बेरोजगारीच्या मागे मूठभर उद्योगपतींच्या फायद्याच्या सरकारी योजनांसोबत उद्योगांवर केलेले तीन महत्वाचे आघात कारणीभूत आहेत. नोटबंदी, लॉकडाऊन आणि जीएसटी वर केलेले प्रयोग. जीएसटीच्या नियमांत आतापर्यंत जवळपास ९०० वेळा बदल केले आहेत.

**देशातील अनेक सरकार सध्या दंड वसुलीकडे एक महत्वाचा उत्पन्न स्रोत अशा दृष्टीने बघत असल्याचे दिसून येते. याशिवाय विजेच्या किमती वाढवल्या आहेत, जागेचे रेडी रेकनर दर वाढवले आहेत ज्यामुळे कर संकलन वाढेल परंतु सोबत जागेच्या किमतीदेखील वाढतील. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे या सगळ्याचा सर्वाधिक फटका बसतो त्या मध्यमवर्गाला याची जाणीवदेखील नाही, म्हणूनच सर्वाधिक भ्रमित वर्ग अशी या वर्गाची व्याख्या करता येऊ शकते.**

*समाजमाध्यमातून साभार*

# लोक म्हणताहेत पाऊस कोपलाय

वर्षाची सरासरी अवघ्या काही दिवसांत, गाठत तो वेड्यासारखा कोसळतोय.

असं काही नाही. त्याचं कुठं काय चुकलंय?

पूर्वी तो वेळेवर न चुकता जूनच्या पहिल्या आठवड्यात यायचा आणि सप्टेंबरअखेर पर्यंत दमादमाने आस्ते कदम बरसत राहायचा.

शाळेच्या सुरुवातीला पोरानटोरांसंगे दंगा करायचा.

ज्येष्ठात तांबड्या मातीतल्या भातशेतीतून लोळण घेत शिवारभर फिरून दमल्यावर, कौलारू घरांवरून घसरगुंडी खेळायचा.

आषाढात वारकऱ्यांच्या पायात घुटमळत दिवेघाटातून दरवळत भवतालात घुमायचा, काळ्या मातीत पेरलेल्या बीजांना गोंजारायचा, आभाळमाया करायचा.

सह्यकड्यापासून सातपुड्यापर्यंत डोंगररांगांवर अभिषेक करायचा, वसिष्ठीला वंदन करुन तापीच्या पायावर लीन व्हायचा, त्याचा हा प्रवास ठरलेला असायचा...

वाटेतल्या बांधांबांधांवर वडिलकीच्या मायेने हात फिरवायचा, एखाद्या चंद्रमौळी झोपडीत वाकून बघताना गहिवरून यायचा, ओल्या बाळंतिणीच्या अंधारल्या खोलीत डोकावून पाहताना बाळाच्या मखमली पायाला गुदगुल्या करायचा.

गावागावातल्या मंदिरांची शिखरे अन् मस्जिदींचे मीनार स्वच्छ धुवून काढायचा, वेशीवरच्या जीर्ण पिंपळाला आलिं-गन द्यायचा, पारावरच्या वटवृक्षाच्या पारंब्यांशी झोंबायचा.

गावकुसातल्या म्हाताऱ्या कोताऱ्यांच्या डोईवरल्या चांदीला स्पर्श करुन अंगणातल्या तुलसी वृंदावनाला वंदन करायचा.

पांदीतल्या आंब्यापाशी आठवणींची सय कुशीत घेऊन झोपायचा, गावांच्या शिवेपाशी थरथरून जायचा.

ओढ्यांच्या कडेने वाहताना

अनंतात लीन झालेल्यांचे अस्तित्व शोधत फिरायचा, कडेवर नातवंडे घेऊन चाललेल्या वृद्धांच्या भाळाचे चुंबन घ्यायचा.

मातीत कोसळून, अंकुराच्या देठातून उगवून यायचा.

म्लान झालेल्या गवतफुलांना लकाकी द्यायचा.

पूर्वीचा पाऊस बोलायचा म्हणे!

माणसंच नव्हे तर झाडंझुडपं पशू पक्षीदेखील त्याच्याशी संवाद साधायचे!

पहिल्या पावसाच्या वेळी त्याचे पूजन व्हायचे,

गावतळे तुडूंब भरल्यावर ओटी भरायचे.

पाऊसही मग जाम खुश व्हायचा,

आपल्या लेकरांवर तालासुरात कोसळायचा.

श्रावणात माहेरी आलेल्या माहेरवाशिणींच्या डोळ्यातून वाहायचा,

तिच्या संगे ऊंच झुल्यावर विहरताना रडता रडता हसायचा.

भाद्रपदात, परतीच्या पावसाची पावले जड व्हायची,

गोठ्याचं दावं तोडून गेलेल्या वासरागत वागायचा.

लहर आली तर परत यायचा, नाहीतर माळांवरच्या झाडांत दडून बसायचा.

निरोप घेताना, तो ओक्साबोक्शी रडायचा!

घरादाराला आशीर्वाद देऊन जायचा,

सूरपारंब्या खेळताना, फांद्यांवर केलेल्या खुणांपाशी रेंगाळायचा.

शहरातल्या डांबरी सडकांवर इंद्रधनुष्य रेखाटायचा,

बागेत बसलेल्या जोडप्यासंगे ओला कंच होऊन जायचा,

गल्लीच्या कोपऱ्यावरल्या टपरीवर

चहाच्या वाफाळत्या चॉकलेटी द्रावणावर जीव लावायचा.

भिजून घरी गेलेल्या चाकरमान्यासंगे घरात मुक्त शिरायचा

आणि थकलेल्या आईच्या हातची गरमागरम भजी खाऊन पुन्हा बाहेर पडायचा,

नव्याने कोसळण्यासाठी!



प्रेमिकांच्या पहिल्या आलिंगनाशी एकजीव होताना पुरता रोमॅण्टिक व्हायचा,

तिच्या गालावरून ओघळत यायचा

आणि त्याच्या ओठांवर स्थिरावायचा.

चेन पडलेल्या सायकलमागे फरफटत जायचा,

हायवेवरून सुसाट जाणाऱ्या गाड्यांच्या चाकांशी स्पर्धा करायचा.

कोसळताना तो काळी तांबडी माती असा भेद करत नसे;

बोरी बाभळींनाही माया लावायचा,

आणि बकुळ प्राजक्तांवरही प्रेम करायचा.

पूर्वी त्याचे काही शिरस्ते होते,

त्याचा एक मौसम होता,

त्याची एक पद्धत होती,

त्याचं एक वेळापत्रक होतं.

पूर्वी माणसांचंही वेळापत्रक होतं म्हणे..

आता लोकांपाशी वेळच उरला नाहीये.

सगळ्याची घाई आहे,

सावकाश निगुतीचं काही उरलंच नाही.

खाणंपिणं असो वा असो झोपणं,

सगळं घाईतच असतं.

मनमुराद गप्पादेखील होत नाहीत,

फुरसतीनं भटकणं होत नाही व्यक्त होण्याचीही घाई असते,

नावालाच बोलायचे असते मन मात्र जागेवर नसते.

रस्त्यांनी घाई, जायची घाई यायची घाई.

ब्रेकअपची सुद्धा असते घाई!

नुसती घाई!

पूर्वी घराबाहेर पडताना उंबऱ्यापाशी हलणारा हात असायचा,

सोज्वळ हसायची अंगणातली जाई आणि प्रेमळ आई!

आता कुठले छंद उरले नाहीत की कुठल्या आवडी हौसेने राहिल्या नाहीत

मने जुळायच्या आधीच तुटायची आस असते.

मागे सिनेमे महिनोनमहिने थियेटरवर असत

आता चारच दिवसांत त्यातली मजा संपलेली असते,

पूर्वी एखादं गाणं वर्षभर ऐकलं जायचं,

आता दिवसागणिक हिट गाणं बदलतं!

पूर्वी, रोज थोडे थोडे पैसे साठवत असत

आता बसतात जॅकपॉटसाठी तिष्ठत,

आताशा तासाला बिग ब्रेकिंगची बातमी बदलते

त्यातलं मूल्यही मिनिटांत संपून गेलेलं असतं!

सकाळची गोष्ट संध्याकाळी राहत नाही,

रात्रीच्या आणाभाका सकाळी स्मरत नाहीत!

महिन्याचं काम एका दिवसात करायचं असतं

वर्षाचं पीक एका महिन्यात काढायचं असतं,

सालभराची कमाई तासात हवी असते,

इतकेच काय कुठली शहाणिवही आता नकोशी असते,

सणवाराला माहेरी यायचीही ओढ नसते.

मौतीला सुद्धा आता माणसं येत नाहीत,

आरआयपीचा मेसेज पाठवतात.

जिवलगांपाशी बसायला माणसांना वेळ नसतो

मायबापांना पोराबाळासाठी नि पोरांना आईसाठी टाइम नसतो

आणि पतीच्या छातीवर मस्तक टेकवायला पत्नीला उसंत नसते.

मैदानांवर खेळासाठी मुलांना सवड नाही,

पुस्तकेही तिष्ठत असतात, वाचणाऱ्या हातांच्या प्रतिक्षेत.

सालं ते प्रेमसुद्धा इन्स्टंट असतं,

सकाळी दृष्टादृष्ट झाल्यावर दुपारीच आडोसा शोधत फिरतं!

श्रमलेल्या पायांवर मस्तक टेकायची ओढ नसते कुणाला,

दमलेल्या हातांना धन्यवाद द्यायला आवडत नाही कुणाला

विचारलाच जाब कुणी तर सरळ सरळ उत्तरतात – वेळच नाही हो कुणाकडे,

हल्ली टाईम भेटत नाही दुनियेला!

पावसाचंही तसंच झालंय

आताशा वेळ नसतो त्याच्याकडे

वर्षाची सरासरी एका दिवसांत गाठतो

कधी कधी महिनाभर येत नाही, कुठे तरी बिझी असतो!अचानक येतो मग.

सुट्टीवर एक दिवसासाठी घरी परत आलेल्या मुलासारखा, पहाटेच येतो, त्याच दिवशी परतण्याचे वेध डोळ्यात घेऊन...!

विचारलं तर म्हणतो आता मन रमत नाही गं आई !

पावसाचंही तसंच झालंय त्याचं आता मन रमत नाही, आता तो बरसतो फक्त बॅकलॉग भरण्यासाठी, त्याच्याकडे वेळ उरला नाही, तो कुणाची विचारपूस करत नाही की,कुणाच्या मस्तकावरून मायेचा हात फिरवत नाही..

दोस्तहो, पाऊस बदललेला नाही आणि चुकलेलाही नाही तो तर आपल्यासारखंच वागतोय! मग त्याला दोष देऊन कसे चालेल?

**ब्रिटीश फोटो जर्नालिस्ट हॅझेल थॉमसन २००२ मध्ये मुंबईच्या रेड लाईट एरियात आली होती तेव्हा कित्येक रात्री ती झोपू शकली नाही. २०१३ मध्ये ती परत तिथेच आली. दरम्यानच्या ११ वर्षात अगदी किंचित फरक झाल्याचे तिला जाणवले. योगायोगाने ती कामाठीपुऱ्याच्या ज्या चौदाव्या लेनमध्ये आली होती तिथल्या एका बिल्डिंगमध्ये ती गेली. त्या कुंटणखाण्याची मालकीण हॅझेलला पुन्हा तिथे आलेली पाहून तडक आतल्या खोलीत निघून गेली. ती संधी साधत आठ फूट उंचीच्या त्या खोलीतील पोटमाळ्याकडे गेली. पोटमाळ्याच्या अर्धवट उघड्या दिसणाऱ्या फळीलगत लाकडी तुकडयांची शिडी उभी करुन ठेवली होती. हॅझेलने शिताफीने शिडी त्या माळ्याला लावली. झपाझपा पायऱ्या चढत ती वर गेली आणि तिला पहिल्यांदा बॉक्स केज (कपाटवजा भिंतीमध्ये बंदिस्त केलेली जागा) दिसली. तिने केजची झडप उघडली तर आत एक तेरा चौदा वर्षाची मुलगी होती. हॅझेलने तिथे येताना भारतीय वेष परिधान करून त्यातल्या ओढणीत कॅमेरा लपवला होता. त्या कॅमेऱ्यानेच तिने त्या मुलीची छबी टिपली. नंतर तिने जेव्हा कधीही हा फोटो पाहिला तेव्हा तिचा जीव कासावीस झाला, कारण फोटोतल्या कुमारीकेचे आर्त, करुण, भावविभोर डोळे! असे वाटते की आता निमिषार्धात त्यातून अश्रू वाहू लागतील...**

पूर्वी केवळ दिल्लीच्या जीबी रोडवर, मुंबईच्या कामाठीपुऱ्यात आणि कोलकत्याच्या सोनागाछीत आढळणारे बॉक्स केजेस आता सर्वत्र कॉमन झालेत. काही दिवसांपूर्वी आपल्या औरंगाबादमध्ये खबरी मित्रांच्या निरोपाच्या आधारे पोलिसांनी टाकलेल्या रेडमध्येदेखील या छळपेट्या आढळल्या होत्या. सोनागाछीत तर मुली दिवसा वर कोंडल्या की भिंतीला लाकडी खिळे मारून प्लायवूड पक्के केले जाते, ते अंधार पडल्यावरच खोलले जाते. हा अंधारच त्यांना मोकळा श्वास घेऊन येतो. इतर सर्व वेश्या अंधाराला कंटाळून गेलेल्या असतात आणि या कोवळ्या मुली अंधाराची वाट बघत घुस्मटत जगत असतात. एनजीओंची



ताकद नखाएव्हढी आणि समस्या डोंगराएव्हढी असा सगळा कारभार आहे. पोलीस आणि स्कीन करन्सीचे दलाल यांचे इतके मोठे रॅकेट देशभर आहे की त्याला धक्का लागणेदेखील कठीण झालेय. मोबाईलने त्यात भर घातलीय. या मुलींची दुःखे आणि त्यांचं जगणं यावर लिहवत नाही. असो ...

त्या मुलीचे फोटो काढून हॅझेल जेव्हा इंग्लंडला परत गेली तेव्हा तिला डिप्रेशन आल्यासारखे झाले होते. जर फोटो काढणारा कासावीस होतो, पाहणाराही त्यांच्या दुःखासाठी व्याकुळ होतो; मग, त्या तलम पंख छाटलेल्या कोवळ्या फुलपाखरांची काय अवस्था होत असेल ?... फोटोतल्या मुलीशी हॅझेलला बोलता आले नाही ही बाब तिला अस्वस्थ करत होती.

ती तिसऱ्यांदा पुन्हा तिथे गेली. तिने त्या मुलीच्या मालकिणीचे हात ओले केले अन् त्या मुलीशी दुभाषाच्या मदतीने संवाद साधला. नंतर तिची सुटकाही केली. पुढे जाऊन आपल्या अनुभवावर पुस्तक लिहिले. (तिच्या ईबुकची लिंक कमेंटमध्ये आहे.) ....अगतिकता, निराशा, वैफल्य, थकवा, भूक, उदासीनता, परात्मभाव, दुःखवेदनांचे अनेक कढ, हे सगळं या फोटोतल्या मुलीच्या डोळ्यात तरळतंय. तिचं कुस्करलेलं बालपण आणि विदीर्ण झालेलं भविष्य यांची विमनस्कता तिच्या चेहऱ्यावर साफ दिसते... तिला प्रतीक्षा आहे अंधाराची...खोल खोल काळ्याकुट्ट अंधाराची....

म्हणूनच सांजेला घरी असलो की कधी कधी अंधार लवकर व्हावा म्हणून मी प्रार्थना करतो... उजेड असतानाच तुळशीपाशी दिवा लावायचा आग्रह बायकोजवळ धरतो.. ती दिवा लावते तेव्हा अशा मुलींचे डोळे त्या ज्योतीत तरळतात आणि माझ्या डोळ्यांच्या कडा ओलावतात....

**– समीर गायकवाड.**

*(हॅझेल थॉमसनने काढलेला 'तो'च फोटो पोस्टसोबत दिला आहे.. या विषयावर लेखन करताना मी आजवरचे फोटो ब्लर्ड करून वा स्त्रियांचे/ मुलींचे चेहरे न दिसतील अशा पद्धतीने दिलेले आहेत पण हा फोटो मलादेखील खूप अस्वस्थ करून गेला आणि विथ परमिशन इथे शेअर केला. कारण, नुसतं सांगून हे अनेकांना तंतोतंत पटलं नसतं. आता या मुलीने संसार थाटलाय, हॅझेलने तिला नवी ओळख दिलीय, स्वावलंबी केलेय आणि स्वाभिमान मिळवून दिलाय. ही पोस्ट आठ वर्षांपूर्वीची आहे, मात्र या व्यवसायातली स्थिती आणि स्वरूप सारेच नव्या रंगात पण जसेच्या तसे आहे)*

## काही आठवलं, कधी तरी कुठं तरी ऐकलेलं.

लग्न जमवण्याची बैठक चाललेली. मुलगा पुण्यात नोकरीला.

मुलाकडील मंडळी सांगत होती, ''आमची फार काही अपेक्षा नाही. पुण्यात लग्न करुन द्या थाटामाटात. एक टू बी एच के फ्लॅट आणि एक फॉर्च्युनर गाडी. बाकी काय फ्रीज, टीव्ही, वॉशींग मशीन अशा छोटयामोठया गोष्टी तर काय प्रत्येकजण देतोच, त्या तर तुम्ही द्यालच !''

नवरा मुलगाही याला मान डोलवत होता.

मुलगी आतल्या खोलीतून ऐकत होती, पाहत होती. मुलगी एकदम तिरमिरीत बाहेर आली आणि कुणाचीच भिडभाड न ठेवता म्हणाली, ''दोन लहान लेकरं पण माहेरहूनच घेऊन येते. तेवढा तरी त्रास कशाला तुम्हांला ?''

ऐकून सगळेच गपगार.

फक्त पोरं आपली असली पाहिजेत, एवढाच पुरुषार्थ. पण फॉरच्युनरच काय इतर कोणतीही गोष्ट

मागणाऱ्या पोरासोबत आपण आपलं फॉर्च्युन बांधू शकत नाही, एवढी समज तर पाहिजेच प्रत्येक पोरीला.

मग तेंडूलकरांचा 'कमला' आठवतो. पाचशे रुपयात एक अदिवासी मुलगी विकत आणून आणि ही ब्रेकींग न्यूज करुन स्वतःचे करियर करु पाहणारा जयसिंह जाधव नावाचा पत्रकार आणि त्याची बायको सरिता. जयसिंहने विकत आणलेली ती निरागस अदिवासी पोर कमला, त्या पत्रकाराच्या बायकोला विचारते, ''मालकांनी तुम्हांला किती रुपयांना विकत आणलं?''

आणि सरिता एकदम भानावर येते, तिला कळतं, अदिवासी मुलीला विकत आणलं म्हणून आपण तिची कीव करतो आहोत पण आपल्या लग्नात तर लाखो रुपयांचा हुंडा दिलाय आपल्या बापानं. या गरीब अदिवासी मुलीची काही का असेना, किंमत तर आहे. माझी तर किंमतच नाही आहे काही. मी तर विकली जाण्याच्या पण लायकीचे नव्हते म्हणून बापाने वर पैसे मोजून धाडलंय या घरात.

---

माझ्या गावातील एक काका लग्न जमविण्यात एकदम माहीर. कोणत्याही लग्नाच्या बैठकीला लोक त्यांना बोलवायचे. ज्या पार्टीने बोलावले त्याला सौदा स्वस्त कसा पडेल, अशी खेळी ते आपल्या गोड आणि धूर्त बोलण्याने साधायचे. त्यांच्या मनासारखे झाले की फार खूश असायचे, ''आज बाजार मस्त तोडला,'' असे कौतुकाने म्हणायचे. मला वाटायचे काकांनी नांगरटीला बैल आणला की काय विकत..!

तसंही अनेकजण बाईला जित्राब देखील म्हणायचे. अजूनही म्हणत असतील...


वैष्णवी या बाजारात बळी पडलेल्या असंख्य मुलींमध्ये अजून एक नाव.

आणि तरीही आपला मिडिया उद्योगपतींची, पुढाऱ्यांची प्रचंड महागडी लग्नं महिना महिना चघळत राहतो. आजही समंजस पोरंपोरी स्पेशल मॅरेज ॲक्टनुसार, सत्यशोधक पध्दतीनं साधंसुधं लग्न करतात. पण ते आपल्याला आवर्जून सांगावं वाटत नाही, त्याचं कौतुकही वाटत नाही.

बाजारातून आपण घरात यायला तयारच नाही की बाजारच येऊन बसलाय आपल्या घरात कोण जाणे?

**– प्रदीप आवटे**

खऱ्याअर्थाने महाराष्ट्राला, महाराष्ट्रातल्या मराठी माणसांना आणि त्या मराठी–माणसांमधल्या प्रायः मराठी–बहुजनांना जागं करु पहाणाऱ्यांची महाराष्ट्र–हितैषी परंपरा, 'प्रबोधनकारां'सारख्या महापुरुषानंतर दुर्दैवाने बव्हंशी खंडीत झाली...त्यानंतर, मराठी–माणसाला तद्दन फसवणाऱ्या राजकीय कःपुरुषांची एक भली मोठी मांदियाळीच महाराष्ट्राच्या छाताडावर नाचू लागली...परिणामतः, महाराष्ट्राची सारासार 'विवेकबुद्धी' नष्ट होऊ लागली आणि त्याच्यावर येऊ घातलेल्या 'भांडवली' व्यवस्थेतल्या संकटांचं–आपत्तींचं (उदा. कंत्राटी–कामगार पद्धत वा आऊटसोर्सिंग इ.) त्याला 'आकलन' होणं अशक्यप्राय बनलं...साप समजून तो भुई थोपटू लागला व आपापसात लढू लागला आणि तिकडे महाराष्ट्रभरात भांडवलदार व त्यांच्या राजकीय–प्रशासकीय 'दलाल' सापांची पिलावळ प्रचंड वेगाने वाढू लागली...'नितीमत्ता' नावाचं त्याचं एकमेव 'भांडवल' उतरणीला लागलं... 'उत्सव–प्रियता' हा मराठी माणसाचा 'वीक पॉईंट' आहे, हे जाणून ढोंगी राजकारणी महाराष्ट्राला सार्वजनिक गणेशोत्सव, महापूजा, दहीहंड्या, गरबे, महापुरुषांच्या जयंत्या–मयंत्या आदींच्या फाजिल उत्सवप्रियतेची 'अफुची मात्रा' पाजू लागले...त्या घातकी उत्सवी–महोत्सवी 'मराठी–ग्लानी'त व अफुच्या नशेतच उत्तरभारतीय उंदीर–घुशींनी महाराष्ट्र पोखरुन टाकला आणि महाराष्ट्राची 'सरस्वती' गुजराथच्या 'लक्ष्मी'ची कधि 'दासी' बनली, ते महाराष्ट्राला आकळलंच नाही...त्यातूनच, महाराष्ट्राची 'महालक्ष्मी' (धनसंपत्ती–जमीनजुमला) व 'राजलक्ष्मी' (राजकीय सत्ता) जैन–गुजराथी–मारवाड्यांच्या घरात पाणी भरु लागली, ''महाराष्ट्रात निर्माण झालेली संपत्ती महाराष्ट्रातल्या मराठी–माणसाच्या मुळावर उठली आणि आपल्या हक्काच्या महाराष्ट्रातच मराठी–माणूस 'दुय्यम–नागरिकत्वा'चा शाप भोगू लागला''!



...जरा फक्त विचार करुन तर बघा की, मराठी–माणसाच्या तोंडचा 'घास' हिरावू पाहणाऱ्या सर्वपक्षीय राजकारणी–उद्योगपती–व्यापारी–नोकरशहांचे षडयंत्र, आज 'प्रबोधनकार ठाकरे' (केशव सीताराम ठाकरे) हयात असते; तर, कशाप्रकारे महाराष्ट्राला गदागदा हलवून त्यांनी, अत्यंत कठोर व ज्वलंत शब्दात, ते उघडं पाडलं असतं!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

कोविड–१९ च्या शरीराचे शवविच्छेदन (पोस्टमार्टम) करणारा सिंगापूर हा जगातील पहिला देश ठरला आहे. सखोल तपासणीनंतर असे आढळून आले की कोविड–१९ हे विषाणू म्हणून अस्तित्वात नाही, तर किरणोत्सर्गाच्या संपर्कात आलेल्या जीवाणू म्हणून अस्तित्वात आहे आणि रक्तात गोठून मानवी मृत्यूला कारणीभूत ठरते. असे आढळून आले की कोविड–१९ आजारामुळे रक्ताच्या गुठळ्या होतात, ज्यामुळे मानवांमध्ये रक्त गोठते आणि रक्तवाहिन्यांमध्ये रक्त गोठते, ज्यामुळे व्यक्तीला श्वास घेणे कठीण होते; कारण मेंदू, हृदय आणि फुफ्फुसांना ऑक्सिजन मिळू शकत नाही, ज्यामुळे लोक लवकर मरतात. श्वसन शक्तीच्या कमतरतेचे कारण शोधण्यासाठी, सिंगापूरमधील डॉक्टरांनी WHO प्रोटोकॉल ऐकला नाही आणि कोविड–१९ वर शवविच्छेदन केले. डॉक्टरांनी हात, पाय आणि शरीराचे इतर भाग उघडून काळजीपूर्वक तपासल्यानंतर, त्यांना आढळले की रक्तवाहिन्या पसरल्या आहेत आणि रक्ताच्या गुठळ्यांनी भरल्या आहेत, ज्यामुळे रक्तप्रवाहात अडथळा येतो आणि शरीरातील ऑक्सिजनचा प्रवाहदेखील कमी होतो ज्यामुळे रुग्णाचा मृत्यू होतो. या संशोधनाबद्दल कळल्यानंतर, सिंगापूरच्या आरोग्य मंत्रालयाने ताबडतोब कोविड–१९ उपचार पद्धतीत बदल केला आणि त्यांच्या पॉझिटिव्ह रुग्णांना ॲस्पिरिन दिली. मी १०० मिलीग्राम आणि इम्रोमॅक घेण्यास सुरुवात केली. परिणामी, रुग्ण बरे होऊ लागले आणि त्यांच्या तब्येतीत सुधारणा होऊ लागली. सिंगापूरच्या आरोग्य मंत्रालयाने एका दिवसात १४,००० हून अधिक रुग्णांना बाहेर काढले आणि त्यांना घरी पाठवले. वैज्ञानिक शोधाच्या काही काळानंतर, सिंगापूरमधील डॉक्टरांनी उपचारपद्धती स्पष्ट करून सांगितले की, हा रोग एक जागतिक फसवणूक आहे, ''हा आजार रक्तवाहिन्यांमधील रक्तसंक्रमण (रक्ताच्या गुठळ्या) आणि उपचार पद्धतीशिवाय दुसरे काहीही नाही.

**अँटीबायोटिक गोळ्या**

दाहक–विरोधी आणि अँटीकोआगुलंट्स (ॲस्पिरिन) घ्या. हे सूचित करते की हा आजार बरा होऊ शकतो. सिंगापूरच्या इतर शास्त्रज्ञांच्या मते, व्हेंटिलेटर आणि अतिदक्षता विभाग (खउण) ची कधीही आवश्यकता नव्हती. या उद्देशासाठीचे प्रोटोकॉल सिंगापूरमध्ये आधीच प्रकाशित झाले आहेत. चीनला हे आधीच माहित आहे, परंतु त्यांनी कधीही त्याचा अहवाल प्रसिद्ध केला नाही. ही माहिती तुमच्या कुटुंबासह, शेजारी, ओळखीच्या व्यक्तींसह, मित्रांसह आणि सहकाऱ्यांसह शेअर करा जेणेकरून ते कोविड–१९ ची भीती दूर करू शकतील आणि हे लक्षात येईल की हा विषाणू नाही तर एक जीवाणू आहे जो केवळ किरणोत्सर्गाच्या संपर्कात आला आहे. फक्त खूप कमी प्रतिकारशक्ती असलेल्या लोकांनीच सावधगिरी बाळगली पाहिजे. या किरणोत्सर्गामुळे जळजळ आणि हायपोक्सियादेखील होतो. पीडितांनी एस्पिरिन–१०० मिलीग्राम आणि अप्रोनिक किंवा पॅरासिटामोल ६५० मिलीग्राम घ्यावे.

*स्रोत: सिंगापूर आरोग्य मंत्रालय*

# भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी लेनिनवादी) लिबरेशन, महाराष्ट्र

## ३१ मे रोजी श्रीरामपूर येथे लाल निशाण पक्षाचे भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी लेनिनवादी) लिबरेशनसोबत विलिनीकरण

लाल निशाण पक्षाचे भा.क.प. माले (लिबरेशन) पक्षासोबत शनिवार दिनांक ३१ मे २०२५ रोजी श्रीरामपूर, जिल्हा अहील्यानगर येथील परिवर्तन सभागृह (गोविंदराव आदिक सभागृह) येथे झालेल्या ऐक्य परिषदेत विलिनीकरण झाले. घटनात्मक लोकशाही उध्वस्त करून उघडपणे फॅसीझमकडे देशाला नेण्याची दिशा भाजप आरएसएस नी घेतली आहे. त्या विरोधात कम्युनिस्ट चळवळीने पुढाकार घेऊन, इतर लोकशाहीवादी संघटनांना बरोबर घेत जनतेचा सर्वंकष प्रतिकार संघटित केला पाहिजे, ही दोन्ही पक्षांची भूमिका आहे. लाल निशाण पक्षाचे विलीनीकरण भाकप (माले) लिबरेशन सोबत होण्याने महाराष्ट्रातील डाव्या चळवळीला बळ तर मिळेलच; परंतु, देशातील पुरोगामी चळवळीला बळ मिळेल, डाव्या चळवळीच्या एकजुटीला चालना मिळेल व फॅसीझम विरोधी लढ्याला ऊर्जा मिळेल अशा विश्वासाने हे पाऊल टाकण्यात आले आहे. या पावलाचे भा.क.पा. (माले) मनःपुर्वक स्वागत करतो. या घटनेमुळे मुळे देशातील डाव्या चळवळीमधील दोन प्रदीर्घ काल जिवंतपणे वावरणाऱ्या उज्वल परंपरांचे एकीकरण होत आहे.

या विलीनीकरण परिषदेकरीता भाकप माले लिबरेशन पक्षाचे महासचिव कॉम्रेड दिपांकर भट्टाचार्य उपस्थित राहिले होते, त्याचबरोबर बिहारमधून लोकसभेतील खासदार व पक्षाचे नेते कॉम्रेड राजाराम सिंह, योजना कर्मचाऱ्यांच्या नेत्या आमदार शशी यादव, एक्टू या मध्यवर्ती कामगार संघटनेचे अध्यक्ष कॉम्रेड शंकर , आयसा या विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्ष कॉम . नेहा यांच्यासह इतर प्रमुख नेते आणि लाल निशाण पक्षाच्या मध्यवर्ती समितीचे नेते उपस्थित राहिले होते. यामध्ये लाल निशाण पक्ष व भाकपा माले चे महाराष्ट्रातील ७०० हून अधिक प्रतिनिधी उपस्थित राहिले होते.

***कॉ. श्याम गोहिल***
भा.क.पा. (माले) लिबरेशन

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

**कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०**